SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी छोले भटूरे
Sambar PURE - VEG | Aromas of South ! पार्सल सुविधा उपलब्ध..
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २३.१०.२०२६ | अंक नं. १७३ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

राजपाल खरेदी करा आणि जिंका 41 दिवस 11 लाखांची बक्षिसे 11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2996299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780



एसआयआर प्रक्रिया रद्द करण्यासाठी नगरमध्ये समविचारी संघटनांनी मार्केट यार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून एसटी बस स्टॅण्डमार्ग दिल्लीगेटपर्यंत प्रोटेस्ट मोर्चा काढला. (छायाचित्र - अमित मन्यार, केडगाव)

# एसआयआर प्रक्रिया रद्द करण्यासाठी अहिल्यानगर शहरामध्ये प्रोटेस्ट मोर्चा

नगर - मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाची (एसआयआर) प्रक्रिया रद्द करण्यासाठी २३ ऑक्टोबर रोजी विविध समविचारी संघटनांनी मार्केट यार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून एसटी बस स्टॅण्डमार्ग दिल्लीगेटपर्यंत प्रोटेस्ट मोर्चा काढला. मतदारयादीतून पात्र नागरिकांची नावे वगळली गेली, तर त्यांचा मतदानाचा अधिकार हिरावला जाऊ शकतो. म्हणून मतदार याद्या पारदर्शक असणे गरजेचे आहे. कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ नये. हा लढा कोणत्याही एका पक्षाचा, धर्माचा, जातीचा नाही; हा आपल्या मतदानाच्या अधिकाराचा, संविधानाचा आणि लोकशाहीचा लढा आहे, अशी भूमिका या मोर्चात मांडण्यात आली. *(पुढील मजकूर पान २ वर)*

# चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणारे जोशी महाराज

पत्रिका पाहून तर कोणीही भविष्य सांगू शकतो. परंतु, चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणे ही एक मोठी विद्या आहे. आपले भविष्य कोणत्या क्षेत्रामध्ये कसे आहे, हेसुद्धा सांगितले जाते.



जसे कर्म तसे फळ, हे शाश्वत सत्य आहे. पण, बऱ्याचवेळा अहोरात्र प्रयत्न करूनही मोठे यश मिळत नाही, हा केवळ देवयोग मानणे, हा श्रद्धेचा भाग आहे. परंतु, भविष्यात काय घडणार आहे, हे तुमच्या वास्तू व चेहऱ्यावर लिहिलेले असते, असे प्रतिपादन बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील जोशी यांनी केले आहे. अनेक काळापासून चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगण्याचे ते कार्य करीत आहेत. जागा, जमीन, शेती, व्यवसाय, लग्न, संतती, वास्तुशास्त्राचे भाकीत ते त्या त्या घरातील कुटुंबप्रमुखाचा चेहरा पाहून करतात.

भविष्य सांगण्याचे अनेक प्रकार आहेत. पंचांगशास्त्राला आधार आहे. पण, चेहऱ्यावरून जे भविष्य सांगितले जाते, ते ज्योतिषशास्त्रावर अवलंबून असते. माणसाच्या चेहऱ्यापासून राग, आनंद, दोष आणि प्रेम, हे सर्व भाव कळतात, त्या अनुषंगाने भविष्य सांगतात.

जोशी हे चेहरा व वास्तू पाहून अचूक भविष्य वर्तविणाऱ्या भविष्यकारांपैकी एक आहेत. आत्तापर्यंत त्यांनी देशभरातील अनेक दिग्गज नेत्यांबाबत वर्तविलेले भविष्य खरे ठरले आहे. फिल्मलाइन, राजकीय, सामाजिक, मराठी-हिंदी अभिनेते, उद्योजक आणि बिझनेसमन, बिल्डर, रियल इस्टेट, शैक्षणिक क्षेत्रातील अनेकांचे भविष्य वर्तविले आहे. घर, ऑफिस, हॉस्पिटल, कारखाना, हॉटेल यांसारख्या जागा; मग मालकीच्या किंवा भाडेतत्वावर असल्या तरी भविष्य सांगतात व इ. दोष टाळण्यासाठी उपासनाही सांगतात, इतकेच नव्हे तर स्त्री-पुरुषांच्या सर्व समस्यांचे निवारण सांगतात. कोणत्याही प्रकारच्या कठीण वा अतिकठीण अडी-अडचणींवर मार्ग काढतात.

आत्तापर्यंत जोशी महाराजांनी वर्तविलेले भविष्य खरे ठरतेच, असा त्यांचा दावा आहे.

ता. आष्टी, जि. बीड । संपर्क : 9006239009, 9075174343

दिवाळीचं सेलिब्रेशन मनसोक्त खरेदीचं परफेक्ट डेस्टीनेशन
₹800/- च्या पुढील खरेदीवर मिळवा आकर्षक हमखास गिफ्ट
₹1600/- च्या पुढील खरेदीवर मिळवा ₹1000/- किंमतीचे रेमंड कंपनीचे आकर्षक बेडशीट अगदी फ्री
ब्रॅन्डेड सारीज • डिझाईनर सारीज • टॉप्स • कुर्तीज • ड्रेस मटेरियल
रंगीबेरंगी वस्त्रांचं अवघं विश्व..
@ आशिर्वाद
- लक्ष्मीपती डिझाईनर साडी स्टुडिओ -
गुरु गणेश कॉम्प्लेक्स, माळीवाडा, अहिल्यानगर
फोन : 0241-2425111 / 9260278511
Conditions Apply*

# हजारो कोटींच्या फसवणूक प्रकरणात तलाठी असलेल्या एजंटला केली अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, न्यायालयाने सुनावली २७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी



नगर - लाखाची गुंतवणूक करा आणि दरमहा आठ ते दहा टक्के परतावा मिळवा, अशा आकर्षक आमिषाने श्रीगोंदा तालुक्यात गुंतवणूकदारांची हजारो कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आलेल्या सिस-पे प्रकरणात मुळचा श्रीगोंदा तालुक्यातील रहिवासी व पुणे जिल्ह्यात तलाठी म्हणून कार्यरत असलेल्या एजंटला नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गव्हाणवाडी फाटा (ता.श्रीगोंदा) येथे अटक केली आहे. त्याला २२ ऑक्टोबर रोजी श्रीगोंदा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दशरथ विठ्ठल रोडे (रा. वडाळी रोड, श्रीगोंदा) असे अटक केलेल्या एजंटचे नाव आहे.

श्रीगोंदा तालुक्यात लाख गुंतवा आणि 'महिन्याला ८ ते १० टक्के परताव्याच्या' आमिषाखाली गुंतवणूकदारांच्या कोट्यवधींच्या फसवणूक घोटाळ्याचा तपास सध्या वेगात आहे. सीस-पे, इन्फिनिटी, बिकन, ग्लोबल ट्रेडिंग आदी कंपन्यांच्या माध्यमातून अवास्तव आणि हमखास परताव्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक उभारण्यात आली. सुरुवातीला काही गुंतवणूकदारांना परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर हजारो गुंतवणूकदारांकडून कोट्यवधी रुपयांचा निधी गोळा करून त्याचा अपहार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात श्रीगोंदा, पारनेरसह राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. गुन्हा उघडकीस आल्यानंतर कंपनीच्या सर्व संचालक फरार झाले. या प्रकरणी नितीन अंबादास गांगर्डे (रा मांदळी, ता कर्जत) यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. पुढे या घोटाळ्याची व्याप्ती वाढल्यावर सदर प्रकरणाचा तपास नगरच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. पो.नि. शरद गोर्डे हे या घोटाळ्याचा तपास करत आहेत.

या प्रकरणात यापूर्वी अनेक एजंटांना अटक झालेली आहे. त्यातील काही जणांना जामीनही मिळालेला आहे. या घोटाळ्यात पुणे जिल्ह्यात कार्यरत असलेला तलाठी दशरथ विठ्ठल रोडे याचे नाव पुढे आले होते. त्यामुळे आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने स्थानिक गुन्हे शाखेला आरोपीचा शोध घेण्याकामी कळविण्यात आले होते.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि.संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलिस अंमलदार गणेश लोंढे, रोहित मिसाळ, प्रताप देवकाते, फुरकान शेख यांचे पथक या आरोपीचा शोध घेत होते. २२ ऑक्टोबरला रोजी पथकाला सदर आरोपी गव्हाणवाडी फाटा (ता.श्रीगोंदा) येथे असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पथकाने तेथे जावून त्याला ताब्यात घेतले व आर्थिक गुन्हे शाखेच्या ताब्यात दिले. आर्थिक गुन्हे शाखेच्यावतीने त्याला २२ ऑक्टोबर रोजी श्रीगोंदा न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला २७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### मालमत्ता जप्तीचा आणखी ६० कोटींचा पुरवणी प्रस्ताव

गुंतवणूकदारांची फसवलेली रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या प्रकरणातील मालमत्ता जप्त करण्यासाठी सुमारे ११५ कोटी रुपयांचा पहिला प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिल्याची माहिती मिळाली आहे. त्यानुसार संबंधित मालमत्तांवर महाराष्ट्र शासनाचे नाव नोंदविण्याची प्रक्रिया करण्यात आली असून, मालमत्ता शासनाच्या ताब्यात घेण्याची कारवाई सुरु आहे. या प्रकरणाच्या तपासात आणखी काही बाबी समोर आल्याने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने सुमारे ६० कोटी रुपयांचा दुसरा पुरवणी प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविला आहे. या प्रस्तावालाही लवकरच मंजुरी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अटक, मालमत्ता जप्ती आणि तपासाचा वाढता वेग यामुळे सिस-पे प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची व्याप्ती पुन्हा चर्चेत आली आहे. मात्र, गुंतवणूकदारांची प्रत्यक्ष किती रक्कम वसूल होणार आणि ती त्यांना कधी परत मिळणार, हा प्रश्न अद्याप कायम आहे. शासनाच्या मंजुरीनंतर मालमत्ता जप्तीची प्रक्रिया आणि पुढील कायदेशीर कारवाई याकडे आता हजारो गुंतवणूकदारांचे लक्ष लागले आहे.

भरारी THE BIGGEST DIWALI MELA
BY GEETA PATEL & NIKITA PATEL
80+ STALLS
Saturday & Sunday 24 & 25 OCTOBER 2026
VENUE - BADISAJAN, AHILYANAGAR
Sponsored By MAHAVIR GROUP BY RAJESH BHANDARI | राजहंस | Sai BOUTIQUE | NAMOH ARCHITECTS | Greenland Valley By Ajit Bora
CLOTHING | FOOTWARE | FOODS | LIGHTING LAMPS | GAMES & MANY MORE
RUDANTA MEDIA: 8011699692

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## भ्रष्टाचार विरोधात २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान दक्षता जनजागृती सप्ताह

नगर – भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असून, भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती करण्यासाठी राज्यात २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. केंद्रीय दक्षता आयोगाच्या घोषणेनुसार हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटे यांनी दिली.

उपअधीक्षक त्रिपुटे म्हणाले, राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचारात गुंतलेले आढळल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परिक्षेत्र कार्यालय – जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, टीव्ही सेंटर समोर, सावेडी, अहिल्यानगर येथे अथवा टोल फ्री क्रमांक १०६४, दूरध्वनी क्रमांक ०२४१२४२३६७७, व्हाट्सअप क्रमांक – ९९३०९९७७००, ९१६८६४१०६४ ई–मेल आयडी dyspacba.nagar@gmail.com / dyspacbahamadnager@mahapolice.gov.in यावर संपर्क साधावा.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग 24x7 कार्यरत असून माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णतः गुप्त ठेवले जाईल. नागरिकांनी निर्भयपणे पुढे येऊन भ्रष्टाचाराविरुद्ध लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटे यांनी केले आहे.

## मुंबईतील सेलिब्रिटींची घरे, महापौरांचा बंगल्यासह शाळांना बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचे ई–मेल

मुंबई – एकापाठोपाठ एक आलेल्या धमकीच्या ई–मेलने मुंबई हादरली आहे. सेलिब्रिटींची घरं, शाळा, महापौरांचा बंगला बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई–मेलमधून देण्यात आली आहे. त्यामुळे खळबळ उडाली असून पोलिसांकडून वेगानं चक्र फिरवण्यात आली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून धमकी देण्यात आलेल्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली असून पोलिसांकडून धमकी आलेल्या ई–मेल्सचा तपास केला जात आहे.

बॉलिवूडचे बिग बी अमिताभ बच्चन यांचे घर ग्रेनाइडने उडवून देण्याची धमकी दिली आहे. बच्चन यांचा बंगला जलसावर ३१ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान हल्ला करु अशी धमकी दिली आहे. त्यासोबतच पंजाबी गायक दिलजीत दोसांझ यालाही धमकी मिळाली आहे. दिलजीत दोसांझ याची २७ नोव्हेंबरला कॉन्सर्ट होणार आहे, याच कॉन्सर्टमध्ये हल्ला करण्याची धमकी दिली गेली आहे.

दादरमधल्या ३ ते ४ शाळांनाही उडवून देण्याची धमकी मिळाली आहे. त्यासोबतच, ऐरोलीतल्या विब्योर शाळेला दुपारी १.११ वाजण्याच्या सुमाराला उडवून देऊ अशी धमकी दिली गेली आहे. धमकीचा ई–मेल आल्यानंतर दादरमधल्या शाळांना सुट्टी दिली गेली आहे. विद्यार्थ्यांना घरी पाठवून पोलिसांकडून शाळेत तपास मोहीम राबवण्यात आली आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांना पुन्हा एकदा धमकीचा ई–मेल प्राप्त झाला आहे. महापौर कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई–मेलमधून देण्यात आली असून, त्यांना धमकी मिळण्याची ही तिसरी वेळ आहे.

## एसआयआर प्रक्रिया रद्द करण्यासाठी नगरमध्ये प्रोटेस्ट मोर्चा

(पान १ वरुन)

मोर्चात कॉ. प्रवीण सोनवणे, अशोक सब्बन, श्याम आसावा, कॉ. महेबूब सय्यद, सुभाष वारे, अर्शद शेख, डॉ. जालिंदर घिगे, शरद संसारे, मदिना शेख, सायली मोहिते, निर्जला चव्हाण, राजू वैराळ, विनायक गोरखे, रविंद्र सातपुते, सोमनाथ केंजळे, फिरोज शेख, बाळासाहेब पालवे, श्याम वैराळ, राजेंद्र कर्डिले, लक्षण शिंदे, शिवाजी कानगुडे, संदिप सकट, अजित कुऱ्हाडे, विलास साठे, अनंत लोखंडे आदी सहभागी झाले होते.

### मोर्चात सहभागी झालेल्या संघटना

एसआयआरविरोधी जनतेचा अखिल भारतीय मंचच्या नावाने काढण्यात आलेल्या या मोर्चात एसएफआय, एआयएसएफ, एआयएसए, एनएसयुआय, युवक काँग्रेस, दिशा, एआयवायएफ, बांधकाम कामगार युनियन, सीटू, एआयटीयुसी, भारतीय जनसंसद, तथागत प्रतिष्ठान, एम.आर. युनियन, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अहमदनगर हॉकर सेवा संघ, एमआर युनियन, नेहरू मार्केट गाळेधारक संघटना व हॉकर युनियन, अहमदनगर जिल्हा मागासवर्गीय ओबीसी अल्पसंख्याक शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी संघटना, रहमत सुलतान फाउंडेशन, लाल निशाण पक्ष, इन्कलाबी नौजवान सभा, अखिल भारतीय किसान महासभा, महाराष्ट्र औद्योगिक वर्कर्स युनियन, इंटक आदी संघटना मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

### या मागण्यांसाठी होता मोर्चा

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवून त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई करावी, निवडणूक आयोगाला दिलेले कायदेशीर संरक्षण रद्द करावे, एसआयआरच्या आधारे तयार केलेल्या मतदार याद्या रद्द करून त्यावर पुढील निवडणुका घेऊ नयेत, अशा मतदार याद्यांच्या आधारे झालेल्या मागील निवडणुकांची चौकशी करून त्या रद्द कराव्यात, २०२४ पूर्वीच्या मतदार याद्या पुन्हा आधारभूत मानाव्यात. त्यानंतर निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार आणि नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सार्वजनिक तपासणी करून मतदार याद्या अद्ययावत कराव्यात, एसआयआरसंदर्भातील सर्व आदेश रद्द करावेत, एसआयआरबाबत निर्णय घेताना वापरलेली सर्व कागदपत्रे जनतेसमोर जाहीर करावीत, निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निवडणूक सुधारणा कराव्यात, मतदारसंघांची पुनर्रचना, लोकसंख्येची मोजणी, एक देश–एक निवडणूक आणि निवडणूक आयोगामार्फत नागरिकत्व ठरवण्याच्या उपाययोजना रद्द कराव्यात, जंतरमंतरला अधिकृत आंदोलनस्थळाचा दर्जा रद्द करण्याचा निर्णय मागे घ्यावा, आशुतोष रांका आणि सौरव दास यांची तात्काळ आणि बिनशर्त सुटका करावी, आंदोलकांवर पोलिसांकडून होणारी दडपशाही आणि बळाचा वापर थांबवावा, यापुढील सर्व निवडणुका ईव्हीएम (ईव्हीएम) मशीनद्वारे न घेता मतपत्रिकेद्वारे (बॅलेट पेपरवर) घेण्यात याव्यात या मागण्या करण्यात आल्या.

## सराईत चोरट्यांची आंतरजिल्हा टोळी छत्रपती संभाजीनगरमधून जेरबंद

### चोरलेल्या जेसीबी सह ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त,स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



सराईत चोरट्यांची आंतरजिल्हा टोळी छत्रपती संभाजीनगरमधून जेरबंद केल्यानंतर त्यांच्या समवेत पोलिसांचे पथक.

नगर – सुपा (ता.पारनेर) परिसरातील एका पेट्रोलपंपाच्या पार्किंगमधून जेसीबी चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून जेसीबीसह ४३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, २६ सप्टेंबर रोजी फिर्यादी गणेश अनिल रासकर (वय २८, रा. वाघुंडे, ता. पारनेर) यांचा जेसीबी सुपा येथील इंडियन ऑईल कंपनीच्या पेट्रोलपंपाच्या पार्किंगमधून अज्ञात आरोपींनी चोरून नेला होता. या प्रकरणी सुपा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला मालमत्ता चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे आणि सुपा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी स्थानिक गुन्हे शाखा व सुपा पोलीस स्टेशनच्या पथकाला या जेसीबी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करण्याचे मार्गदर्शन करून रवाना केले होते.

तपासादरम्यान २२ ऑक्टोबर रोजी तपास पथकाला गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माहिती मिळाली की, विशाल दुबीले (रा. शिवपूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) याने आपल्या साथीदारांसह हा जेसीबी चोरून नेला असून, तो छत्रपती संभाजीनगरमधील पैठण तालुक्यातील शेकटा गावाच्या शिवारात वीटभट्टीजवळ लपवून ठेवला आहे. ही माहिती मिळाल्यावर पथकाने पंचासमक्ष त्या ठिकाणी छापा टाकून विशाल काकासाहेब दुबीले (वय २२, रा. शिवपूर, ता. गंगापूर) व प्रदीप बाबासाहेब सुकासे (वय २०, रा. नागापूर, ता. गंगापूर) यांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपी विशाल दुबीले याने इतर साथीदारांच्या मदतीने क्रेटा कारने येऊन सुपा येथील पेट्रोलपंपावरून जेसीबी चोरल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून इतर दोन आरोपींनाही ताब्यात घेतले; त्यात गौरव योगेश त्रिभुवन (वय १९, रा. रागीरीनगर, ता. वैजापूर) आणि संग्राम चंद्रहास डरे (वय २०, रा. कननक सागज, ता. वैजापूर) यांचा समावेश आहे. तपासादरम्यान पोलिसांनी ३० लाख रुपये किमतीचा एक जेसीबी आणि १३ लाख रुपये किमतीची विनाक्रमांकाची क्रेटा कार असा एकूण ४३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व आरोपींना जप्त मुद्देमालासह सुपा पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले आहे.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदार गणेश लबडे, श्यामसुंदर जाधव, किशोर शिरसाठ, अमृत आढाव, महादेव भांड, फुरकान शेख, प्रशांत राठोड व सुपा पोलीस स्टेशनचे मेघराज कोल्हे यांच्या पथकाने केली आहे.

## मजुरीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून तरुणाला बेदम मारहाण; गुन्हा दाखल

नगर – मजुरीचे पैसे मागण्यासाठी गेलेल्या एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना नगर तालुक्यातील रुईछत्तीसी गावात घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आदिनाथ सर्जेराव लोखंडे (वय २६, धंदा मजुरी, रा. रुईछत्तीसी, ता. जिल्हा अहिल्यानगर) याने फिर्याद दिली आहे. शांतीलाल भानुदास खाकाळ आणि श्रीकांत शांतीलाल खाकाळ (दोघे रा. रुईछत्तीसी, ता. जिल्हा अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास रुईछत्तीसी गावातील खंडेश्वर टायर दुकानासमोर हा प्रकार घडला. फिर्यादी आदिनाथ लोखंडे हे आरोपी श्रीकांत खाकाळ याच्या घरी मजुरीचे पैसे मागण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी श्रीकांत याने फिर्यादीला, तू आमच्या घरी पैसे मागण्यासाठी का आलास? असे म्हणत वाद घालून फिर्यादीला उचलून जमिनीवर आपटले. तसेच लाथाबुक्क्यांनी पाठीत व पोटात मारहाण केली. यादरम्यान रस्त्यावर पडलेला दगड उचलून आरोपीने फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. त्यानंतर आरोपी शांतीलाल खाकाळ याने फिर्यादीला धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी फिर्यादी लोखंडे याने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असताना दिलेल्या जबाबावरून २२ ऑक्टोबर रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सौ. मायाताई दुधाडे यांचे निधन



नगर – वांबोरी येथील सौ. मायाताई दुधाडे (वय ४९) यांचे निधन झाले.

त्यांच्या पक्षात पती, मुलगा, मुलगी, पुतणे, दिर, नातू असा परिवार आहे. वांबोरी (ता. राहुरी) येथील नाभिक समाज बांधव अरुण दुधाडे यांच्या पत्नी होत.

### मंगलबाई सांगळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – भुतकरवाडी येथील रहिवासी श्रीमती मंगलबाई नामदेव सांगळे (मॅडम) (वय ८०) यांचे २३ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नागेश (बापु) सांगळे यांच्या त्या मातोश्री होत.

### अनिताबाई तांबे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सावेडी येथील रहिवासी सौ. अनिताबाई अनिल तांबे (वय ६१) यांचे अल्प आजाराने २२ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### चंद्रकांत चंगेडे यांचे वृद्धापकाळाने निधन

पुणे – चंदननगर पुणे येथील रहिवासी चंद्रकांत प्रेमराज चंगेडे (वय ८६) यांचे २२ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पुणे बी. जे. मेडीकल कॉलेज येथे देहदन करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, ८ नातवंडे असा परिवार आहे. मनोज, संदीप, जयश्री कटारिया, छाया गांधी यांचे ते वडील होत.

### सुभद्राबाई कोठूळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – खडकी येथील रहिवासी श्रीमती सुभद्राबाई मुरलीधर कोठूळे (वय ९५) यांचे २२ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत व दत्तात्रय कोठूळे यांच्या त्या मातोश्री होत.

## बहुतांशी ठिकाणी स्वपक्ष वा मित्रपक्षांच्या विरोधातच लढत

### पारनेर, अकोले, राहुरीसह राखीवच्या काही जागांच्या लढती ठरणार रंगतदार



नगर – जिल्हा सहकारी बँकेच्या २१ पैकी ११ जागा बिनविरोध झाल्या असून उर्वरीत ज्या दहा जागांसाठी निवडणूक होत आहे त्यातील पारनेरची जागा वगळता इतर नऊ जागांवर आपल्याच पक्षाच्या वा मित्रपक्षाच्या विरोधात निवडणूक लढली जात असून यातील पारनेर, अकोले, राहुरीसह राखीवच्या काही जागांच्या लढती रंगतदार ठरण्याची चिन्हे आहेत. या निवडणुकीसाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान होवून लगेचच ३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. दहा जागांसाठी २७ उमेदवार रिंगणात आहेत. विखे–थोरात–गडाख यांच्या विरोधात लंके–लोखंडे यांचे पॅनल उतरले असून सभापती राम शिंदे यांनी सवतासुभा मांडत तीन जागांवर उमेदवार दिलेले आहेत. सहकारात राजकारण नको हे कारण देत प्रत्येकाने पक्षीय निष्ठांना बाजूला ठेवत आपल्या सोयीने घरोबा केला आहे.

पारनेर सेवा सोसायटी मतदारसंघातील लढत खासदार नीलेश लंके व भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांच्यात होत असली तरी या लढतीला लंके विरूध्द माजी खासदार डॉ. सुजय विखे असेच स्वरूप प्राप्त झालेले आहे. विखेंनी विधानसभा निवडणुकीत खा. लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांचा पराभव करत आ. काशिनाथ दाते यांना निवडून आणून लोकसभेच्या पराभवाचा वचपा काढला होता. परंतु पुन्हा एकदा ते लंकेंना धोबीपछाड देण्याच्या मूडमध्ये आहेत, तर लंके हेही जिल्हा बॅंकेत जायचेच असा चंग बांधून आहेत. त्यामुळे ही लढत जिल्ह्यात नव्हे तर राज्यात चर्चेचा विषय ठरली आहे. राहुरी व अकोल्याची लढतही रंगत वाढवणारी असून त्यासोबतच राखीवच्या सहा जागांपैकी काही जागांमध्ये चुरस निर्माण होईल, असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

### सेवा सोसायटीच्या चार जागांपैकी तीन जागांवर स्वपक्षीयांतच लढत

राहुरीमध्ये आमदार प्राजक्त तनपुरे व देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजीत कदम यांच्यात सरळ लढत असून विशेष म्हणजे हे दोघे भाजपामध्ये आहेत. अकोलेमध्ये आमदार किरण लहामटे व जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांची कन्या संजीवनी शिंदे यांच्यात सरळ लढत होत असून लहामटे व गायकर हे दोघेही राष्ट्रवादी कॉग्रेसच्या अजित पवार गटासोबत आहेत. कर्जतमध्ये ज्योती शिंदे व तुषार पिसाळ यांच्यात लढत होत असून हे दोघेही भाजपामध्ये आहेत. पारनेरचा वगळता इतर तीनही सेवा सोसायटी मतदारसंघात स्वपक्षीयांमध्येच लढती होत आहेत.

### राखीव मतदारसंघातही मित्रपक्षांमध्ये लढती

अनुसूचित जाती –जमाती राखीव मतदारसंघात माजी आमदार वैभव पिचड व प्रशांत लोखंडे यांच्यात सरळ लढत होत असून पिचड भाजपामध्ये तर लोखंडे हे शिवसेनेच्या शिंदे गटात कार्यरत आहेत. राज्याच्या व जिल्ह्याच्या राजकारणात हे दोन्ही मित्रपक्ष आहेत. भटके विमुक्त राखीव मतदारसंघातून लढत असलेले गणपतराव सांगळे हे इंदिरा काँग्रेस पक्षाचे तर त्यांच्या विरोधात लढणारे ऋषीकेश ढाकणे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे असून या दोघांचे पक्ष राज्याच्या व जिल्ह्याच्या राजकारणात एकत्रित आहेत. इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) मतदारसंघातून लढत असलेले कारभारी जावळे हे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आहेत पण याच मतदारसंघात लढत असलेले जालिंदर वाकचौरे व अजिनाथ हजारे हे भाजपामध्ये असूनही एकमेकांच्या विरोधात लढत आहेत. शेती पूरक राखीव मतदारसंघात आ. आशुतोष काळे व सुधीर म्हस्के यांच्यात सरळ लढत होत असून काळे हे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटासोबत असून म्हस्के शरद पवार गटाचे राहाता तालुकाध्यक्ष आहेत. महिला राखीव मतदारसंघातील दोन जागांसाठी उभ्या असलेल्या अनुराधा नागवडे ह्या सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटासोबत आहेत, तर संगिता वाघ या इंदिरा काँग्रेस सोबत आहेत. त्यांच्या विरोधात लढत असलेल्या मंजुषा गुंड ह्या भाजपामध्ये आहेत. तर हर्षदा काकडे ह्या सध्या सेनेच्या शिंदे गटासोबत आहेत. अपक्ष उमेदवार सुवर्णा पाचपुते या भाजपाच्या कट्टर कार्यकर्त्या आहेत. संध्या महाडुंळे ह्या शरद पवार गटाच्या श्रीगोंदे तालुक्यातील कार्यकर्त्या आहेत. राखीव मतदारसंघातील या बहुतांशी लढती मित्रपक्षांमध्येच होत आहेत.

## सोन्या–चांदीच्या भावात घसरण

मुंबई – डॉलरच्या मजबुतीचा आणि अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरांशी संबंधित घडामोडींचा परिणाम मौल्यवान धातूंच्या बाजारावर होत असून गेल्या दोन दिवसांत सोन्याच्या दरात सुमारे २ हजार रुपयांची, तर चांदीच्या दरात तब्बल १० हजार रुपयांची घसरण झाल्याची माहिती सराफा व्यावसायिकांनी दिली आहे. दर कमी झाल्याने ग्राहकांकडून सोने खरेदीसाठीचा कल वाढला आहे.

गेल्या दोन दिवसांपूर्वी प्रति १० ग्रॅम सोन्याचा दर सुमारे १ लाख ४४ हजार रुपये होता. त्यात जवळपास २ हजार रुपयांची घसरण होऊन सोन्याचा दर आता १ लाख ४२ हजार रुपयांपर्यंत खाली आल्याचे सांगण्यात येत आहे. दुसरीकडे, चांदीच्या दरातही मोठी घसरण झाली आहे. प्रति किलो २ लाख ९ हजार रुपये असलेला चांदीचा दर जवळपास १० हजार रुपयांनी कमी होऊन १ लाख ९९ हजार रुपयांवर आला आहे. हे दर जीएसटी वगळून असल्याची माहिती देण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील बदलांमुळे आगामी काळात दर पुन्हा वाढू शकतात किंवा आणखी कमी होऊ शकतात. त्यामुळे खरेदीदारांचे लक्ष आता बाजारातील पुढील घडामोडींकडे लागले आहे.

## दुष्काळाची कारणे आणि घ्यावयाची खबरदारी यावर निमगाव वाघा येथे ‘काव्य लेखन स्पर्धेचे’ आयोजन

### २८ ऑक्टोबरपर्यंत कविता पाठविण्याचे आवाहन



नगर – दुष्काळाची कारणे, त्याचे परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी याविषयी जनजागृती व्हावी, तसेच नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने निमगाव वाघा येथे काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डांगरे डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दुष्काळासारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर काव्यलेखनातून जनजागृती घडवून आणणाऱ्या या उपक्रमात कवींनी सहभागी व्हावे, असे आवाहन डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी केले आहे.

स्पर्धेसाठी ‘दुष्काळाची कारणे, घ्यावयाची खबरदारी’ हा विषय निश्चित करण्यात आला आहे. या विषयाच्या माध्यमातून दुष्काळामागील कारणांचा वेध घेतानाच पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पाण्याचे नियोजन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणी बचतीचे महत्त्व कवितेतून मांडण्याची संधी स्पर्धकांना मिळणार आहे.

या काव्यलेखन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवींनी आपली कविता २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजकांनी निश्चित केलेल्या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कविता कोणत्याही काव्यप्रकारात लिहिता येणार असून, ती अर्थपूर्ण असणे आवश्यक आहे. स्पर्धकांनी विषयाची व्याप्ती लक्षात घेऊन आपल्या कवितेतून दुष्काळाची वस्तुस्थिती, पाणीटंचाईची तीव्रता आणि त्यावरील उपाय प्रभावीपणे मांडावेत, अशी अपेक्षा आहे.

या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना राज्यस्तरीय नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलन २०२६ या कार्यक्रमात अनुक्रमे एक हजार, पाचशे आणि तीनशे रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील कवी, साहित्यप्रेमी आणि नवोदित लेखकांना आपल्या प्रतिभेचे दर्शन घडविण्याची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

ग्रामीण भागातील साहित्यिक चळवळीला प्रोत्साहन देतानाच सामाजिक प्रश्नांवर साहित्याच्या माध्यमातून जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न या स्पर्धेतून करण्यात येत आहे. दुष्काळासारख्या ज्वलंत विषयावर कवींनी आपल्या संवेदनशील लेखणीतून विचार मांडावेत आणि समाजाला पाणी बचत व जलसंधारणाचा संदेश द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कवींनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने कविता लिहू नये. अशा प्रकारे लिहिलेल्या कविता स्पर्धेसाठी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. कविता कोणत्याही काव्यप्रकारात असली तरी ती अर्थपूर्ण असावी. कवितेमध्ये कमीत कमी चार आणि जास्तीत जास्त सहा कडवी असणे अपेक्षित आहे. तसेच धर्म, जात आणि राजकारण यांवर टीका करणारी कविता स्पर्धेतून बाद करण्यात येईल, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

सर्वांच्या काव्यप्रतिभेला वाव मिळावा आणि ग्रामीण भागातील साहित्यिकांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कविता व्हॉट्सअप क्रमांक ९२२६७३५३४६ या नंबरवर पाठविण्याचे म्हंटले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### बदाम खाण्याचे लाभ

रोजच्या आहारात सुक्या मेव्यांचे सेवन करणे आणि नियमित व्यायाम करणे ही एका निरोगी, तंदुरुस्त आणि आनंदी जीवनशैलीची गुरुकिल्ली आहे. या दोन्हीच्या एकत्रित प्रभावामुळे शरीरामध्ये अनेक महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक बदल होतात. नियमित व्यायाम केल्यामुळे शरीराचे स्नायू बळकट होतात आणि शरीराची कार्यक्षमता वाढते. यात बदाम, अक्रोड आणि खजूर यांसारख्या सुक्या मेव्यांची जोड मिळाल्यास शरीराला उच्च दर्जाची प्रथिने आणि नैसर्गिक ऊर्जा मिळते. व्यायामामुळे खर्च झालेली ऊर्जा भरून काढण्यासाठी सुके मेवे अत्यंत उपयुक्त ठरतात, ज्यामुळे दिवसभर थकवा जाणवत नाही आणि शरीर नेहमी ताजेतवाने राहते. अनेक लोकांना असे वाटते की सुक्या मेव्यांमध्ये चरबी असल्यामुळे वजन वाढते, परंतु योग्य प्रमाणात सेवन केल्यास ते वजन नियंत्रणात ठेवण्यास मोठी मदत करतात. सुक्या मेव्यांमध्ये तंतुमय पदार्थ (फायबर) भरपूर असतात, ज्यामुळे पोट दीर्घकाळ भरल्यासारखे राहते आणि वारंवार खाण्याची सवय टाळता येते. तसेच, व्यायामामुळे अतिरिक्त कॅलरी जळतात आणि सुक्या मेव्यांमुळे पचनक्रिया सुरळीत राहून बद्धकोष्ठतेचा त्रास दूर होतो. सुके मेवे हे मेंदूचे अन्न मानले जातात. विशेषतः बदाम आणि अक्रोड नियमित खाल्ल्याने मेंदूच्या पेशींना योग्य पोषण मिळते, ज्यामुळे स्मरणशक्ती तल्लख होते आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते. मेंदूमध्ये रक्तप्रवाह सुधारतो आणि सुक्या मेव्यातील पोषक घटकांमुळे मानसिक ताणतणाव कमी होऊन मन शांत राहण्यास मदत होते. सुक्या मेव्यांमध्ये असणारे 'हेल्दी फॅटस्' (निरोगी स्निग्ध पदार्थ) आणि अँटिऑक्सिडंटस् हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतात. यामुळे रक्तातील खराब कोलेस्ट्रॉल कमी होते.

## पाककला

### आंबा नारळ रोल

**साहित्य :** पिकलेल्या हापूस आंब्याचा गर १ वाटी, खवलेला ओला नारळ १ वाटी, साखर १/२ वाटी, मिल्क पावडर २ चमचे, तूप १ चमचा, वेलची पावडर १/४ चमचा, काजू-बदाम काप १ चमचा, डेसिकेटेड नारळ २ चमचे

**कृती :** कढईत तूप गरम करून त्यात खवलेला नारळ व आंब्याचा गर घालून मध्यम आचेवर परतून घ्या. त्यात साखर घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत सतत ढवळत रहा. त्यात मिल्क पावडर, वेलची पावडर व काजू-बदाम काप घालून मिश्रण एकजीव करा. मिश्रण कढई सोडू लागले की गॅस बंद करून थोडे थंड होऊ द्या. हाताला थोडे तूप लावून मिश्रणाचे छोटे-छोटे रोल तयार करा. तयार रोल डेसिकेटेड नारळात घोळवून घ्या. १५ मिनिटे फ्रीजमध्ये सेट होऊ द्या. तयार आंबा नारळ रोल सर्व्ह करा.

## वास्तू

### ईशान्य कोपरा

✻ घराच्या ईशान्य (उत्तर-पूर्व) कोपऱ्यात पिण्याचे पाणी किंवा लहान पाण्याचा तांब्या ठेवावा. तो कोपरा नेहमी स्वच्छ आणि मोकळा असावा.

✻ तिजोरीत किंवा पाकिटात थोडे अक्षता (तांदूळ) आणि लाल कापड ठेवल्याने धनवृद्धी होते.

✻ ईशान्य कोपरा हा देवघरासाठी सर्वोत्तम आणि सर्वात शुभ मानला जातो.

## सौंदर्य

१ चमचा मधात काही थेंब लिंबाचा रस मिसळून चेहऱ्याला लावा. १०-१५ मिनिटांनी पाण्याने धुवा. यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते आणि डाग हलके होतात.

## सल्ला

कोथिंबीर ताजी ठेवण्यासाठी तिची मुळे कापा आणि देठ एका ग्लासभर पाण्यात बुडवून ठेवा. त्यावर वरून प्लास्टिकची पिशवी हलकी झाकून फ्रीजमध्ये ठेवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६

**स्वाती रवि, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, उ.भा.२०।३२, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात यश मिळून तुमचे मन प्रसन्न राहील.

**वृषभ :** प्रवासाचे योग असून नवीन ओळखी भविष्यात फायदेशीर ठरतील.

**मिथुन :** आरोग्य बिघडेल. निर्णय चुकतील.

**कर्क :** कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**सिंह :** तुमचे कष्टाचे चीज होईल, मान-सन्मानात वाढ होईल.

**कन्या :** जुने वाद संपल्याने मन हलके होईल.

**तुळ :** आरोग्याची स्थिती उत्तम राहील.

**वृश्चिक :** वरिष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल.

**धनु :** शैक्षणिक आणि बौद्धिक क्षेत्रात विशेष प्रगती पाहायला मिळेल.

**मकर :** आर्थिक गुंतवणूक करताना हितावह ठररेल.

**कुंभ :** मित्रांसोबत उत्तम वेळ जाईल आणि प्रलंबित कामे मार्गी लागतील.

**मीन :** दिवस अत्यंत शुभ असून मानसिक शांतता अनुभवायला मिळेल.

## शब्दगंध क्र. ७५४२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) जिल्ह्याचे ठिकाण असलेले मराठवाड्यातील एक शहर ५) वेल; वल्लरी; लतिका ७) चोप; ताडन ८) ज्याला आवश्यकता अथवा जरुरी आहे असा १०) दूध देईनासे झालेले जनावर १२) मख; यज्ञ; यजन १३) पत्नी; दारा; जाया १७) एक सम संख्या; एका महिन्यातील सरासरी दिवस १९) काठ; किनारा; तट २०) आश्चर्यचकित २१) वायू; वात २२) ऐसपैस घातलेली मांडी २३) हक्क; शत्रुत्व; दुष्मनी; फिर्याद; तक्रार २४) वजनदार; मंद बुद्धीचा २५) रसाने भरलेले; रसाळ २६) बैलाच्या मानेवरील जोखड २७) इंग्रजी वर्षाचा पाचवा महिना

**उभे शब्द :-** १) भारतीय जनता पक्षाच्या एक नेत्या तथा मध्यप्रदेशच्या माजी मुख्यमंत्री २) आठवणीत राहवी म्हणून केलेली रचना ३) उपवन; उद्यान; बगीचा ४) हर; भाव; किंमत; प्रत्येक ५) गरम मसाल्यातील एक तिखट पदार्थ ६) वडील; जनक; बाप; पिता ९) एक हिंदी चित्रपट अभिनेत्री - ++ बच्चन ११) झाकण असलेले भांडे १४) साधू; संन्यासी १५) एक औषधी वनस्पती १६) केस गळाल्याने डोक्याचा उघडा पडणारा भाग १८) एका ठिकाणी बसणे उठणे २०) मरगळ; ग्लानी; शीण २३) द्वार; कवाड; दरवाजा २४) यश; सफलता; जीत

शब्दगंध क्र. ७५४१ चे उत्तर



फिल्मीचक्कर क्र. १२५९ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** ध्येय गाठणे म्हणजे यश नव्हे, तर ध्येयाकडे जाणारा प्रवास प्रामाणिकपणे जगणे म्हणजे यश.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपण स्वतः स्वतःला गुदगुद्या केल्यावर हसू का येत नाही?

मानवी मेंदूची रचना ही अतिशय गुंतागुंतीची आणि आश्चर्यकारक आहे. जेव्हा आपल्याला कोणी बाहेरची व्यक्ती गुदगुद्या करते, तेव्हा मेंदूतील मुख्यत्वे दोन भाग अतिशय वेगाने आणि सक्रियपणे काम करतात.

पहिला भाग म्हणजे सेरेबेलम जो आपल्या शरीराच्या हालचाली आणि समतोल राखण्याचे काम करतो आणि दुसरा भाग म्हणजे सोमॅटोसेंसरी कॉर्टेक्स जो त्वचेवरून येणाऱ्या स्पर्शाच्या संवेदना ओळखतो. जेव्हा एखादी दुसरी व्यक्ती आपल्याला अचानक गुदगुद्या करते, तेव्हा मेंदूला त्या स्पर्शाचा किंवा त्यामागील कृतीचा अगोदर अजिबात अंदाज नसतो. ही संवेदनशीलता मेंदूसाठी पूर्णपणे अनपेक्षित आणि नवी असते. मेंदूला जेव्हा अचानक अशा प्रकारचा अनपेक्षित स्पर्श जाणवतो, तेव्हा तो त्याला एक संभाव्य धोका किंवा आश्चर्य मानून सावध होतो आणि शरीराला त्वरित बचावात्मक सिग्नल पाठवतो. या अनपेक्षित आणि अचानक घडलेल्या प्रकारामुळे मज्जासंस्थेत एक तीव्र प्रतिक्रिया निर्माण होते, ज्यामुळे शरीरातील स्नायू आकुंचन पावतात आणि चेहऱ्यावर व शरीरावर अनावर हसू किंवा खदखद निर्माण होते. ही एक प्रकारची शरीराची बचावात्मक आणि भावनिक प्रतिक्रिया असते.

याउलट, जेव्हा आपण स्वतःच स्वतःला गुदगुद्या करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे वेगळी असते. जेव्हा आपण स्वतःला स्पर्श करण्यासाठी हात पुढे करतो, तेव्हा आपला मेंदू आधीपासूनच पूर्णपणे सज्ज आणि सतर्क असतो. मेंदूतील सेरेबेलम हा भाग आपण नेमकी कोणती हालचाल करणार आहोत, आपला हात कुठे स्पर्श करणार आहे आणि त्याचे परिणाम काय असणार आहेत, याची संपूर्ण माहिती हालचाल होण्यापूर्वीच शरीराच्या इतर भागांना आणि मज्जासंस्थेला अगोदरच पाठवून देतो.

मेंदूला या स्पर्शाचा आणि त्याच्या वेळेचा आधीच अचूक अंदाज असल्यामुळे तो या संवेदनेला कोणतीही नवीन किंवा आश्चर्यकारक गोष्ट मानत नाही.

मेंदूला हे चांगले ठाऊक असते की ही कृती बाहेरून नसून स्वतःकडूनच होत आहे, त्यामुळे त्याबद्दल कोणतीही अनपेक्षितता किंवा आश्चर्याचा धक्का उरत नाही. परिणामी, मेंदू या स्पर्शाच्या संवेदनेला दुय्यम, निरुपयोगी किंवा कमी महत्त्वाचे मानून त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतो.

मेंदू कोणतीही बचावात्मक किंवा हसण्याची प्रतिक्रिया उमटवत नाही, ज्यामुळे आपल्याला स्वतःला गुदगुद्या केल्यावर अजिबात हसू येत नाही. ही मेंदूची एक अत्यंत महत्त्वाची नैसर्गिक यंत्रणा आहे, जिच्यामुळे मेंदू स्वतःच्या कृती ओळखतो आणि अनावश्यक ऊर्जा किंवा विनाकारण शरीरावर होणाऱ्या प्रतिक्रिया टाळू शकतो.

### योगदान

एका छोट्या निसर्गरम्य गावात एक विशाल आणि जुने वडाचे झाड होते. उन्हाळ्यात त्या झाडाच्या सावलीत सर्व गावकरी विश्रांती घेत असत आणि पक्षी त्यावर आपली सुंदर घरटी बांधून राहत असत. एकदा कडक उन्हाळ्याचे दिवस आले. प्रचंड उन्हामुळे गावातील सर्व लहान-मोठे तलाव, ओढे आणि विहिरी वाळून गेल्या. सर्वत्र पाण्याचे भीषण संकट उभे राहिले. झाडावर राहणारे पक्षी पाण्यावाचून अतिशय व्याकुळ झाले.

झाडाच्या शेंड्यावर राहणाऱ्या एका हुशार कावळ्याने सर्व पक्ष्यांची सभा बोलावली. कावळा म्हणाला, मित्रांनो, आपल्या जंगलाच्या पलीकडे एक मोठा पाण्याचा तलाव आहे. परंतु तिथून येथे पाणी आणणे एका पक्ष्याचे काम नाही. आपण जर सर्वांनी मिळून थोडे-थोडे योगदान दिले, तर आपण सर्वांची तहान सहज भागवू शकतो.

सर्व पक्ष्यांनी मिळून ठरवले की प्रत्येकाने आपल्या चोचीतून शक्य तेवढे पाणी आणायचे आणि झाडाच्या खाली असलेल्या एका जुन्या दगडी पात्रात टाकायचे. गरुड आणि घार या मोठ्या पक्ष्यांनी एकाच वेळी जास्त पाणी आणण्यास सुरुवात केली, तर चिमण्या आणि सुतार पक्षी आपल्या छोट्या चोचीतून पाण्याचे थेंब आणू लागले. एक लहानसा सुतार पक्षी न थकता आपल्या छोट्याशा चोचीतून पाण्याचा एकेक थेंब आणून पात्रात टाकत होता. काही मोठे पक्षी मनातल्या मनात हसत होते की या छोट्या पक्ष्यांच्या एका थेंबाने काय फरक पडणार आहे?

परंतु सर्व पक्षी दिवसभर न थकता सतत उडून पाणी आणत राहिले. संध्याकाळपर्यंत ते मोठे दगडी पात्र पाण्याने काठोकाठ भरले! त्या पाण्यामुळे झाडावरील सर्व पक्ष्यांची, त्यांच्या पिल्लांची आणि जमिनीवरील अनेक लहान प्राण्यांची तहान भागली. तेव्हा कावळा सर्वांना म्हणाला, आज जर मोठ्या पक्ष्यांनी 'आम्हीच जास्त काम केले' असा अहंकार केला असता किंवा छोट्या पक्ष्यांनी 'माझ्या एका थेंबाने काय फरक पडतो' म्हणून प्रयत्न सोडून दिले असते, तर हे पात्र कधीच भरले नसते. सर्वांच्या एकत्र येण्याने आणि प्रत्येकाच्या छोट्या-मोठ्या योगदानामुळेच आज सर्वांचे प्राण वाचले आहेत.

बोध : कोणतेही योगदान हे छोटे किंवा मोठे नसते. समाजासाठी किंवा समूहासाठी दिलेली प्रत्येक लहानशी मदतही तितकीच मोलाची असते. जेव्हा सर्वजण एकत्र येऊन आपापल्या क्षमतेनुसार योगदान देतात, तेव्हा सर्वात मोठी संकटेही सहज टाळता येतात.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

अशा गूढ रहस्यांची दीक्षा गुरुकडून आपल्या शिष्यांना तोंडी स्वरुपात दिली जाते. त्यामुळे ह्याबाबत अधिक प्रमाणात लेख, साहित्य उपलब्ध नाहीत. सुदैवाने ह्या विषयाबाबत काही धर्मग्रंथ माहिती देतात. पण पुष्कळसे लोक ह्या ग्रंथांचे वरवर वाचन करतात. त्या धर्मग्रंथात दिलेल्या अंतरीय मार्गाच्या खाणाखुणा आणि संदर्भ त्यांना समजत नाहीत. ज्या व्यक्तिला हे ''द्वार'' (शिवनेत्र, देवाचे द्वार जे दोन भुवयांमध्ये आहे) समजते तो धर्मग्रंथांमध्ये दिलेल्या खाणाखुणा, इशाऱ्यांना व संदर्भांना समजतो आणि आम्हाला सुध्दा समजावू शकतो. असा अनुभवी पुरुष जेव्हा आम्हाला समजावतो. तेव्हा ह्या संदर्भाचा आणि अवतरणांचा (उल्लेखांचा) काय अर्थ आहे हे आम्हाला समजते, तेव्हा आम्हाला कळते की हे धर्मग्रंथ आम्हाला अंतरीय मार्गाचा नकाशा (ठावठिकाणा) दाखवीत आहेत. ज ह्या प्रवेशद्वारापर्यंत आम्ही कसे पोहचावे ? अंतरी प्रवेशाचे द्वार शिवनेत्र अथवा दिव्यचक्षू आहे ह्याचे ज्ञान होणे हे अंतरीच्या प्रवासाचे पहिले पाऊल आहे. परंतु आम्ही ह्या द्वारापर्यंत कसे पोहोचू ? आम्ही ठिकाणाला कसे शोधू शकू? प्राचीन काळापासूनच संत आणि महापुरुषांनी ह्या द्वारापर्यंत पोहोचण्याची एक पद्धती सांगितली आहे ती म्हणजे ध्यान अभ्यास. आम्हाला आमचे ध्यान जगातून काढून घेऊन अंतरी मंडळात जाणाऱ्या द्वारावर केंद्रित करायचे आहे, टिकवायचे आहे. त्यासाठी आम्हाला आमचे ध्यान बाहेरून काढून अंतर्मुख करावे लागेल.

ध्यान केंद्रित करणे (ध्यान टिकवणे)

ध्यान हे आत्म्याचे बाह्य स्वरुप आहे. मन आणि इंद्रिये आमचे ध्यान बाह्य जगाकडे लावतात. आम्ही आपल्या इंद्रियांमार्फत बाह्य जगातील गतिविधींची, घटनांची माहिती घेण्याचे काम आपल्या इंद्रियांमार्फत करतो. भूत आणि भविष्याशी जोडले गेलेले आमच्या मनातील विचार आम्हाला गोंधळून टाकतात. भूतकाळात झालेल्या अडीअडचणीबाबत आम्ही विचार करतो व त्यानुसार भविष्यकाळाबाबत आमच्या योजना ठरवित जातो. आम्ही त्यांचे परिक्षण करतो. चांगले वाईट याबाबत नीट तपासतो. त्यांच्यातील उणीवा जाणून घेतो व त्यांची मीमांसा करतो. अशा रीतीने आमचे मन सातत्याने ह्या जगात अडकून राहते व त्यामुळे आमचे ध्यान दिव्य द्वारापासून नेहमीच दूरवर राहत जाते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

जर खरंच आपल्याला बदल करायचा असेल तर, तो वैचारिक स्तरावर करू या. जर आपले मन शुद्ध राहिले तर आपल्या विचारांत, शब्दांत आणि कृतीत सुसंगती असेल. असे केल्याने आपली नाती सुबोध होतील. जर आपले विचार स्वच्छ आणि शुद्ध असतील तर आपल्या आतील कपाटाची दारं (वाईट विचार आणि शब्द) आपोआप उघडली जाण्याची भीती राहणार नाही. आपण प्रामाणिक राहिलो तर आपले आयुष्य आपोआपच जास्त सहज, सोपं आणि सुटसुटीत होईल.

जर आपण कुठलाही नकारात्मक विचार धरून ठेवला नाही तर आपले तरंग स्वच्छ राहतील. परिणामी आपल्याला इतरांशी हळुवारपणे आणि मायाळूपणे बोलण्यासाठी कोणत्याही प्रकारचे कष्ट घ्यावे लागणार नाहीत. आपण आपल्या विचारांवर काम केल्यामुळे हा बदल आपोआप घडेल. जे मनात असेल तेच बाहेर येईल. जर आधीपासूनच आपले मन स्वच्छ असेल तर आपण टीका केल्यानेही कोणाचं मन दुखावणार नाही. याचं कारण त्याच्यापर्यंत पोहोचणारे तरंग शुद्ध आणि शक्तिशाली असतील आतून बाहेरच्या दिशेने रूपांतरणचिरंतन प्रेमाकडे घेऊन जाणारे मंत्रजेव्हा लहान मूल परफॉर्म करतं किंवा त्याची हुशारी दाखवतं तेव्हा सगळे त्याचं कौतुक करतात आणि त्याला शहाणा मुलगा म्हणतात. त्या वयात त्या मुलाच्या मनात अशी विचारप्रणाली विकसित होते की, जेव्हा तो चांगलं काम करतो तेव्हा लोक त्याचं कौतुक करतात आणि त्याला चांगला मुलगा म्हणतात.लहान असताना जेव्हा आपण चुका करतो तेव्हा लोक आपल्या कृतीवर नाही तर आपल्यावरच म्हणजे चुका करणाऱ्यावर टीका करतात. आपला स्वाभिमान सार्वजनिक मतावर अवलंबून जातो. जर लोकांनी कौतुक केलं तर आपण चांगले आहोत आणि जर लोकांनी टीका केली तर वाईट असे आपण समजायला लागलो. सर्वांची चुकीची असतील, वर्तमानातील संस्कार नकारात्मक असतील तरीसुद्धा प्रत्येक आत्मा शुद्ध आणि सुंदर आहे. व्यक्तीला तिच्या सर्व दोषांपासून वेगळं करा. असं केल्याने आत्म्याला स्वतःमधल्या शुद्धतेची व्यक्त होण्यासाठी ताकद मिळेल आणि त्याला त्याच्या सवयी बदलण्यासाठी मदत होईल. जेव्हा आपण इतरांना आपलं मत सांगतो तेव्हा आपले विचार आणि शब्द यात सुसंगती असायला हवी.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : सांगा पाहू, जगात असे कोणते पुस्तक आहे ज्याची पाने खूप जाड असतात पण त्यावर एकही अक्षर छापलेलं नसते?

गण्या : तुमचे रजिस्टर! त्यात फक्त हजेरीचे रकाने असतात वाचायला काहीच नसते

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ वन महोत्सवाची सुरुवात कोणत्या वर्षी झाली?

– इ.स. १९५० (के. एम. मुन्शी यांनी केली)

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

शरीरशुद्धीनंतर देण्यात येणारा आहार हा पचण्यास हलका, धातूवर्धक, बलवर्धक शरीराला मजबुती देणारा असा असावा. आहारामध्ये काळे मनुके, भाजलेले शेंगदाणे व गूळ, गायीचे सात्विक तूप, खजूर, लोणी, दूध, बदाम, अंजीर, ओले खोबरे, नारळाचे पाणी, लाडू याचा समावेश असावा. रोज रात्री झोपताना दोन खारीक, दोन बदाम, चार-पाच काळे मनुके भिजत घालावे व सकाळी उठल्यावर प्रथमच त्यातील बदाम, काळे मनुके व खारीक खाऊन दूध पिऊन घ्यावे. अतितिखट पदार्थ कमी खावेत. प्रवास, रात्रीचे जागरण, अति वडेवाड करू नये. मन प्रसन्न व आनंदी ठेवावे. अंघोळीला गरम पाणी वापरू नये, थंड किंवा कोमट पाण्याने अंघोळ केल्यावर चेहऱ्याशी शतधौत घृत लावून दूध प्यावे. रोज सकाळी व संध्याकाळी १ चमचा दुर्वांकुर घ्यावा तसेच दिवसभरात पिण्यासाठी सुवर्णसिद्ध जल वापरावे.

सुवर्णसिद्ध जल :रोज रात्री हंडाभर पाणी उकळण्यास ठेवावे. त्यामध्ये सोन्याचे बिस्किट किंवा वेढा टाकावे. पंधरा मिनिटे चांगले उकळल्यानंतर ते पाणी थंड करावे. दुसऱ्या दिवशी ते पाणी गाळून प्यावे. या पाण्यामुळे आजारांविरुद्ध लढण्याची प्रतिकारशक्ती तयार होते. तसेच पुरुषांनी कवचबीज, शिलाजीत, गोखरू, अश्वगंधा, सफेद मुसळी, गुळवेल, शतावरी या औषधी द्रव्यांनी युक्त दुर्वांकुर शिलाजित कॅप्सूल सकाळी व रात्री एक या प्रमाणे सुरू कराव्यात. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे वरील सर्व उपचार, आहार-विहाराने आरोग्य संपन्न व तेजस्वी सुसंस्कारीत बाळ निश्चितच जन्माला येते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# नगरमध्ये २४ व २५ ऑक्टोबरला संत साहित्य संमेलन

नगर - संतांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या अहिल्यानगरीत दोन दिवस संत साहित्यांचा जागर होणार आहे. राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग, साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या आर्थिक सहयोगातून व नगरच्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट संचालित श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाच्या विद्यमाने अहिल्यानगर जिल्ह्यातील संतसाहित्य व परंपरा या विषयावर जिल्हास्तरीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २४ व २५ ऑक्टोबर रोजी सावेडीच्या माऊली सभागृहात हे साहित्य संमेलन होणार आहे. यानिमित्ताने जिल्ह्यातील विविध संतांना भेटण्याची तसेच अध्यात्मिक संगीत नाटक, भारुड, नृत्याविष्कार व संत साहित्याच्या परिसंवादाची अनोखी पर्वणी नगरकरांना मिळणार आहे. संतविचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, जिल्ह्यातील संत साहित्य आणि भक्तिपरंपरेचे वैभव अधोरेखित करणे हा या संमेलनामागील प्रमुख उद्देश आहे. या संमेलनाची जय्यत तयारी व नियोजन संयोजन समितीने सुरु झाले आहे, अशी महिती संत साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष सतीश मुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



संत साहित्य संमेलनाची माहिती देताना स्वागत अध्यक्ष सतीश मुळे. यावेळी संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ.दिलीप धनेश्वर, सचिव संजय खेले, सह स्वागताध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित उपस्थित होते.

संमेलनाची अधिक महिती देताना संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. दिलीप धनेश्वर यांनी सांगितले, नगर शहरात प्रथमच जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलन होत आहे, २४ ऑक्टोबर रोजी सकाळी संत साहित्याच्या दिंडीने साहित्य संमेलांची संमेलनाची सुरवात होणार आहे. सावेडीच्या माऊली सभागृह जवळून सकाळी ९:३० वाजता ही संत साहित्य दिंडी निघणार आहे. ग्रंथ दिंडी नंतर सकाळी ११ वाजता संतसाहित्य नगरी (माऊली सभागृह) येथे ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन नगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

सकाळी ११:३० तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत व पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन संजीवन व्यासपीठावर होणार आहे. यावेळी शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, ज्येष्ठ साहित्यिक, संत साहित्य व लोकसंस्कृतीचे गाढे अभ्यासक प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे, प्रमुख उपस्थिती डॉ. बी. जी. शेखर पाटील, प्राचार्य प्रकाश टाकळकर, प्रा. डॉ. राजेश गायकवाड व डॉ. राजेंद्र ठाकूर, संत साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष सतीश मुळे, सह स्वागताध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप धनेश्वर आदी उपस्थित राहणार आहेत.

२४ ऑक्टोबरच्या दुपारच्या सत्रात महाराष्ट्राची परंपरा असलेल्या भारुडाचे आयोजन दुपारी ३ ते ४:३० या वेळात होणार आहे. दुपारी ४:३० ते ६ यावेळेत संप्रदाय परंपरा आणि समता व समरसतेच्या दृष्टीने सांस्कृतिक मूल्य प्रस्तुती या विषयावर परिसंवाद होणार आहे. पहिल्या दिवसाची सांगता श्रुती संगीत निकेतन प्रस्तुत संत रंगी रंगले या कार्यक्रमाने होणार असून याचे संयोजन डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी केले आहे.

रविवार दिनांक २५ ऑक्टोबर संमेलाच्या दुसऱ्या दिवसाची सुरवात सकळी ९:३० वाजता संतचरित्र लेखनाचे प्रयत्न या विषयावर परिसंवादाचे आयोजन असून तसेच ११ ते १:३० यावेळेत वारकरी संप्रदायातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरांचे स्वरूप, शुचित्व व सांप्रदायिक महत्त्व या विषयावर तिसऱ्या परिसंवादाचे आयोजन केले आहे. दुपारी ३ ते ४:३० यावेळेत स्त्रीशक्ती-संतस्वरा-नृत्याविष्काराचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४.३० ते ६ यावेळेत संमेलनाची सांगता होणार असून या समारोपास श्रीक्षेत्र गोदाधाम तथा सराला बेटचे महंत रामगिरिजी महाराज यांच्या हस्ते होणार असून विशेष उपस्थिती रा.स्व.संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, शास्त्रीय संगीत तज्ज्ञ पं.डॉ. विकास कशाळकर, म.सा.प. पुणेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ रंगकर्मी योगेश सोमण, शासनाच्या साहित्य संकृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, मुंबईचे ए.डी.जी.पी. कृष्णप्रकाश, साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. बी. जी. शेखर पाटील व प्रा.डॉ. राजेश वि. गायकवाड व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल सहस्रबुद्धे आदींसह संमेलनाचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या सांगता सोहळ्यात विविध लेखकांच्या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. तसेच संत पायिक पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

सायं. ७.३० वाजता संत साहित्य संमेलांचे प्रमुख आकर्षण असलेले डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित संगीत सखा पांडुरंग या नव्या संगीत नाटकाच्या शुभारंभाच्या प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रुति संगीत निकेतनच्या डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी या संगीत नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. सर्व नगरकरांनी या अनोख्या पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

यावेळी संत साहित्य संमेलनाच्या संयोजन समितीचे सचिव संजय खेले, सहसचिव धनंजय गाडगीळ, सह स्वागताध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, कार्यवाह दत्तात्रय भालेराव, स्वागत संयोजक प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, प्रा, राजू रिक्कल, प्रा.मीरा पटारे व प्रा. भीमराज पटारे डॉ. स्वप्निल सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## कोल्हेकुईकडे दुर्लक्ष करावे

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




बा माणसा, कशाला करतोस सगळ्या गावाच्या उठाठेवी ? स्वतःच्या हिताकडे फक्त लक्ष ठेव. प्रत्येकाचेच असते ढोंग. तुला कधी समजायची नाही कुणाची चाल. तू फक्त आपल्या कामात लक्ष घाल. कुणाच्याही बाबत कुणाचाही विचार नसतो पक्का. एकदा एक बोलतील, तर लगेच त्याला देतील धक्का. प्रत्येकाला हवे असते स्वतःच्या पोळीवर तूप. म्हणून आपण बसावे चूप. आद्य शंकराचार्य म्हणतात, पुष्कळशी माणसे सदा चिंताक्रांत. सगळ्या जगाच्या मूर्खपणाबद्दल करतात आकांत. स्वतःच्या संसाराबद्दल मात्र सदा भ्रान्त. अरे, आधी स्वतःचा मूर्खपणा आवर. कुटुंबाच्या समस्या सावर. स्वतःच्या कल्याणावर दे भर. नाही का कुणी असा, की जो देईल तुला तुझ्या भल्याचा भरवसा? समजाऊन सांगेल की व्यवहारात तू वाग असा? जग काय म्हणेल याचीच तुला चिंता ? सत्ता आणि संपत्तीवाल्यांचा तुझ्यावर प्रभाव. आपल्या सामर्थ्याच्या जाणिवेचा मात्र अभाव. असा कसा रे तुझा विचित्र स्वभाव ? तू स्वतःच स्वतःचा पक्का हात धर. आपल्या सदसद्विवेकबुद्धीला अनुसर. लोकांच्या कोल्हेकुईकडे दुर्लक्ष कर. थोरांनी सांगितलेले विचार आचार.

संत तुकारामांनी, लोक कसे असतात, याचे वर्णन केले आहे. ऐसा हा लौकिक कदा राखवेना। पतित पावना देवराया ।। बहू बोलो जाता म्हणती हा वाचाळ। न बोलता सकळ म्हणती गर्वी ।। लग्न करू जाता म्हणती हा मातला। न करिता झाला नपुंसक ।। लोक तैसा ओक धरिता धरवेना। अभक्ता जिरे ना संतसंग ।।

तुम्ही कसेही वागा, लोक करतील त्रागा. लोकांचे समाधान करणे कधीही न जमणे. तुम्ही कितीही चांगले कराल, तरी तोंडघशी पडाल. बोलला नाहीत, तर गर्विष्ठ. बोललात तर वाचाळ म्हणून अशिष्ट. लग्न केलेत तर म्हणतील माजला. न केलेत तर माणसातून गेला. जशी ओकारी आवरता येत नाही नं तसे लोकांचे तोंड धरता येत नाही. स्वतः सद्गुणांची, सन्मान्यांची चाड धरावी. लोकांच्या बडबडीला मूठमाती द्यावी.

देवदत्त मोठा धार्मिक. दरवर्षी एकादशीला पंढरीला जायचा. विठोबापुढे हात जोडायचा. पुण्य जोडून परतायचा. यावर्षीही तसाच पंढरीला निघाला. घोड्यावर बसून बाहेर पडला. रस्त्यात एक गावातला भला माणूस भेटला. म्हणाला, कुठे चाललास देवदत्ता ? पंढरीला घोड्यावर बसून? उन्हं तापताहेत. टांग्यातू जा. देवदत्त परतला. कुठे निघालास? पंढरीला. टांगा जुंपून बाहेर पडला. दुसरा सज्जन भेटला.

पुण्य जोडायला? अरे मग टांग्यातून चाललास? पायपीट घडेल घोड्याला, ती कामी पडेल घोड्यालाच पुण्य जोडायला. तुला काय मिळणार? अरे, पायी जा पंढरीला. वारकरी काय टांग्यातून जातात. ?

देवदत्त टांगा घेऊन घरी परतला. मग पायी निघाला. वाटेत गावचा जोशी भेटला.

काय देवदत्ता.. पायी कुठे निघालास? पंढरीला. पायी निघालास? अरेरे! खरंच ते काय म्हणतात, की घरी धन असलं तरी भोगायला नशीब लागतं. तुझ्या नशिबातच नाही रे घोडागाडी. म्हणून चाललास असा अनवाणी. शिव शिव तू तर पालखीतून जायला हवंस. देवदत्त परतला पालखीत बसला. दोन माणसे समोर. दोन माणसे मागे. पालखी पुढे. पुढ्यात उभा झाला गावचा पाटील म्हणाला, देवदत्ता कुठे निघालास? पंढरीला. पंढरीला? मला वाटलं मसणाला. अरे, चौघांच्या खांद्यावरुन मसणाला जातात. पंढरीला नाही. देवदत्त पुन्हा घरी परतला. रात्र झाली. एकादशी संपली. पंढरीचा नेम चुकला. देवदत्त पुण्य गमावून बसला. म्हणूनच म्हणतात. ऐकावे जनाचे, पण करावे आपल्या स्वच्छ मनाचे. **- किशोर गांधी**

# लोक हक्क फाउंडेशनची सराला येथे २४ ऑक्टोबर रोजी त्रैमासिक सभा

**उपस्थित राहण्याचे माजी आमदार लहू कानडे यांचे आवाहन**

नगर - लोक हक्क फाउंडेशनची महत्त्वपूर्ण त्रैमासिक सभा २४ ऑक्टोबर रोजी दुपारी लोक हक्क भवन (मु. पो. सराला, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेला सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन लोक हक्क फाउंडेशनचे अध्यक्ष तथा माजी आमदार लहू कानडे यांनी केले आहे.

मागील सभेला सर्व सदस्यांची लाभलेली उपस्थिती व सहकार्य यामुळे अनेक महत्त्वाचे प्रकल्प यशस्वीरीत्या मार्गी लागले आहेत. त्याबद्दल सर्व सहकाऱ्यांचे आभार मानत त्यांनी पुढील नियोजनाची माहिती दिली. येत्या २४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या सभेमध्ये लोक हक्क फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांच्या पुढील वाटचालीचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच, सामाजिक हित आणि विकासाच्या दृष्टिकोनातून सदस्यांच्या नवीन संकल्पना व कल्पना प्रत्यक्षात आणण्याबाबत सविस्तर चर्चा केली जाणार आहे. ही सभा अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्व पदाधिकारी व सदस्यांनी आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून २४ ऑक्टोबर ही तारीख राखीव ठेवावी आणि सभेला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन माजी आमदार लहू कानडे यांनी केले आहे.

# बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील बाल आनंद मेळाव्यात लाखो रुपयांची उलाढाल



नगर - अ.ए.सो.च्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत २३ व २४ ऑक्टोबर रोजी बाल आनंद मेळावा उत्साहात झाला. मेळाव्याचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षा सौ. गीता गिल्डा यांच्या हस्ते व अ.ए. सोसायटी सल्लागार श्रीमती मीनाताई बोरा व अ.ए. सोसायटी सल्लागार भूषण भंडारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक-विद्यार्थी यांच्या उपस्थितीत झाला.

विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान समजावे, लहान वयातच विद्यार्थ्यांना खरेदी विक्री, पैश्यांची देवाण-घेवाण यांचा अनुभव घेता यावा यादृष्टीने एक चांगला उपक्रम अ.ए.सो. ची बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेने राबविला, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. ज्योती सिसोदिया यांनी आपल्या प्रास्ताविकात बाल आनंद मेळाव्याचा उद्देश सांगितला.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी प्रशालेने राबविलेल्या बालआनंद मेळाव्यास शुभेच्छा देऊन या उपक्रमाचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी वेगवगेळ्या प्रकारचे खाद्यपदार्थ, भाजीपाला यांचे एकूण १९३ स्टॉल्स लावले, यावेळी लाखो रुपयांची उलाढाल झाली. या प्रसंगी प्रशालेतील हजारो पालकांनी व विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. बाल आनंद मेळाव्यातील भुताच्या वाड्यातील नाचणाऱ्या भुतांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

सुत्रसंचलन कांतिलाल खुरंगे व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. सविता शेळके यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशालेच्या शिक्षकांनी, पालक व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.




नालंदा स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून साकार करण्यात आलेला क्रीडा गणवेश जिल्हास्तरीय व त्यापुढील स्तरावरील स्पर्धांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना.ले.कर्नल यशवंत बहादुर्गे, पल्लवी बहादुर्गे, हैदर डिसूजा यांच्या हस्ते देण्यात आला. (छायाचित्र - समीर मन्यार)

# नालंदा स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून क्रीडा गणवेशाचे डिझाईन

**जिल्हास्तरीय स्पर्धेतील खेळाडूंना मोफत क्रीडा गणवेशाचे वाटप**

नगर - विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देत क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नालंदा स्कूलने अभिनव उपक्रम राबविला. शाळा स्थापनेच्या दहाव्या वर्षात पदार्पण करताना शालेय स्पर्धात्मक क्रीडांसाठी अधिकृत गणवेशाचे रंग आणि डिझाइन निश्चित करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आली. विद्यार्थ्यांनीच तयार केलेल्या संकल्पनेतून विद्यालयाचा क्रीडा गणवेश तयार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून साकार करण्यात आलेला गणवेश जिल्हास्तरीय व त्यापुढील स्तरावरील स्पर्धांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गणवेश मोफत देण्यात आला.

इयत्ता दहावीतील विद्यार्थी आणि विद्यार्थी परिषदेच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. निदी लुनिया आणि प्राप्ती पटेल यांनी टी-शर्ट व शॉर्टस् तसेच ट्रॅकसूटचे डिझाईन बनवले. मनाची शांतता, परस्पर विश्वासातून आत्मविश्वास मिळविणे आणि स्थिरतेतून सामर्थ्य निर्माण करत संघर्ष करण्याची व हार न मानण्याची जिद्द या मूल्यांचे दर्शन यामधून घडते. पल्लवी बहादुर्गे,हैदर डिसूजा यांच्या पुढाकारातून तसेच ले.कर्नल यशवंत बहादुर्गे यांच्या सहकार्याने हा उपक्रम साकारण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा व कल्पकतेचा सन्मान करण्याबरोबरच त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा शाळेचा हा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांच्यात संघभावना निर्माण करणे आणि क्रीडा क्षेत्रातील सहभागाला प्रोत्साहन देणे हा यामागील प्रमुख उद्देश असून, विद्यार्थ्यांच्या अपेक्षा आणि उपलब्ध साधने यांचा समतोल राखत विद्यालयाच्या वतीने दरवर्षी नवनवीन उपक्रम राबविण्यात येतात. येथील शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून, संधी, संस्कार, उज्वल भविष्य असल्याचे सांगत क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह जिल्हास्तरीय किंवा त्यापुढील स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेच्या अधिकृत क्रीडा रंगांचा गणवेश भेट देण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतलाअसल्याचे विद्यालयाचे चेअरमन ले.कर्नल यशवंत बहादुर्गे यांनी सांगितले.

# मतमाऊलीच्या सुवर्णमहोत्सवी यात्रेनिमित्त नगरमध्ये २५ ऑक्टोबरला आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर

**तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी, आहार सल्ला व औषधवाटप**



नगर - मतमाऊलीच्या ५० व्या यात्रेनिमित्त संत आन्ना चर्चच्या वतीने आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत संत अन्ना चर्च, जुने कलेक्टर ऑफिसजवळ, अहिल्यानगर येथे हे शिबिर पार पडणार आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांची तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणी करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार आहारविषयक मार्गदर्शन आणि मोफत औषधांचे वाटपही केले जाणार आहे.

धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बदलती जीवनशैली, अनियमित आहार आणि वाढता मानसिक ताण यांमुळे उच्च रक्तदाब, मधुमेह तसेच अन्य आजारांचा धोका वाढत आहे. अनेकदा आजाराची लक्षणे स्पष्ट दिसत नसल्याने वेळेवर तपासणी होत नाही. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांना एकाच ठिकाणी विविध आरोग्यविषयक तपासण्यांची सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे.

शिबिरामध्ये रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, संपूर्ण शारीरिक तपासणी, दातांची तपासणी, ईसीजी, स्त्री रोगविषयक तपासणी, हाडांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन तसेच डोळ्यांची तपासणी अशा विविध सुविधा उपलब्ध असणार आहेत. तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांना त्यांच्या आरोग्यविषयक तक्रारींबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच योग्य आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैली यांचे महत्त्वही समजावून सांगितले जाणार आहे. शिबिरात पात्र गरजूंना मोफत औषधांचे वाटप करण्यात येणार आहे.

संत आन्ना चर्चचे प्रमुख धर्मगुरू फादर मेकन्रो लोपीस आणि सहाय्यक धर्मगुरू नाथनियल जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा कमिटीचे सभासद शिबिराच्या नियोजनासाठी परिश्रम घेत आहेत. आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विविध स्तरांवर तयारी सुरू असून, नागरिकांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे.

मतमाऊलीच्या सुवर्णमहोत्सवी यात्रेनिमित्त आयोजित हा उपक्रम धार्मिक उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देणारा ठरणार आहे. याचा लाभ घेऊन स्वतःच्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी व रक्तदानासाठीही सहभागी व्हावे, असे आवाहन संत अन्ना चर्चच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाचन प्रेरणा दिन व विद्यार्थी दिन उत्साहात

**एक तास वाचनाचा, नवा संकल्प ज्ञानाचा!**




नगर - भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रेरणादायी शिक्षक भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात १५ ऑक्टोबर हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो यानिमित्ताने श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल आणि मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर येथे १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन व विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या उपक्रमात शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांनी सहभाग नोंदविला. या निमित्ताने प्रत्येकाने घरून आपले आवडते पुस्तक आणले होते. सर्वांनी सलग एक तास मनःपूर्वक वाचन करून वाचनाचा आनंद अनुभवला.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेतील सुमारे ८०० जणांनी एकाच वेळी वाचनात तल्लीन होणे. एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थिती असूनही संपूर्ण शाळेत कमालीची शांतता अनुभवायला मिळाली. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि पालक यांनी एकत्रितपणे वाचन केल्यामुळे परिसर वाचनमय झाला होता.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचनसंस्कृती रुजविणे, ज्ञानाची व्याप्ती वाढविणे आणि पुस्तकांशी मैत्री दृढ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी आणि संस्मरणीय ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शालेय शिक्षण समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक तसेच संस्थेच्या समिती सदस्यांनी शाळेतील अभिनंदन केले आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

# विद्यार्थ्यांनी पुस्तक वेडे व्हा : शिवाजीराव नाईकवाडी

## वाचन प्रेरणा दिनी जिल्हा वाचनालयाच्या वतीने विद्यार्थ्यांशी संवाद

नगर - भारतासारख्या प्रगत असलेल्या देशात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोबाईल प्रत्येकाच्या हाती आला आहे. मात्र त्यातून मिळणाऱ्या माहितीवर अवलंबून न राहता आपण पुस्तक वाचनातून ज्ञानी व्हावे. जीवनात यश मिळवायचे असेल तर पुस्तक वेडे व्हा. तेच तुम्हाला खऱ्या अर्थाने यशस्वी माणूस म्हणून घडवतील असा आशावाद माणुसकीची शाळाचे प्रणेते शिवाजीराव नाईकवाडी यांनी व्यक्त केला.



डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयात साजरा करण्यात आला.

भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयात आयोजित कार्यक्रम प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. यावेळी हिंद सेवा मंडळाच्या संचालिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी, पुस्तकांच्या चळवळीत कार्य करणाऱ्या अक्षरवेलच्या रूपाली सोनवणे, वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, मुख्याध्यापक चित्रकार अशोक डोळसे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, संजय गाडेकर आदी उपस्थित होते.

प्रा. कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना वाचन, खेळ, लेखन यातून युवा वर्गाचे व्यक्तिमत्व घडते. माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांचा वाचनातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेला यशाचा व कार्याचा आदर्श आज आपल्यासमोर आहे. आपण अखंडपणे वाचन करून आपल्या ही जीवनात यश मिळवावे असे प्रतिपादन केले. जिल्हा वाचनालयाच्या वतीने दादा चौधरी च्या विद्यार्थ्यांना मोफत सभासदत्व देण्यात येणार आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी वाचनातून मिळालेली प्रेरणा ही आपल्याला बिकट परिस्थितीतही यशाच्या मार्गावर घेऊन जाते. शालेय जीवनात वाचनाचे संस्कार हे पुढील यशस्वी जीवनासाठी प्रेरक असल्याने विद्यार्थी दशेत वाचनाच्या संस्काराची कास धरणे महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

यावेळी दादा चौधरी शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला. वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे सामूहिक वाचन करून वाचन प्रेरणाची शपथ घेतली. यामध्ये खुशी दरेकर, साई ठोंबे, प्रिन्स वाघमारे, ऋषिकेश सपकाळ, अनुष्का चंगेडिया, सुदर्शन जाधव, साईनाथ म्हस्के, रवी राठोड, यश काळे, यश चव्हाण यांनी विविध पुस्तक वाचन करून आपला सक्रिय सहभाग नोंदवला.

यावेळी जोशी सर, सौ. गुंडू, सौ. घोडे, सौ. धारणगावकर, श्री. कुलकर्णी आदी शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. आभार ग्रंथपाल अमोल इथापे यांनी मानले.



राज्यस्तरीय करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी अहिल्यानगर केंद्रावर झाली.

# पेमराज सारडा महाविद्यालय, नगरची 'बिन रंगांची गोष्ट' अंतिम फेरीसाठी पात्र

### अहिल्यानगर केंद्रावर राज्यस्तरीय करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी

नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आयोजित राज्यस्तरीय करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी अहिल्यानगर केंद्रावर झाली. जिल्हा वाचनालयाच्या सावेडी येथील सभागृहात झालेल्या या फेरीत विविध नाट्यसंस्था आणि महाविद्यालयांच्या संघांनी एकांकिकांचे सादरीकरण केले. या स्पर्धेतून पेमराज सारडा महाविद्यालयाच्या बिन रंगांची गोष्ट या एकांकिकेची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, सागर मेहेत्रे, जालिंदर शिंदे, सुदर्शन कुलकर्णी आणि प्रशांत जठार उपस्थित होते. स्पर्धेचे समन्वयक म्हणून अनंत जोशी यांनी काम पाहिले. या प्राथमिक फेरीसाठी मंगेश सातपुते आणि इरफान मुजावर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सहभागी संघांनी विविध विषयांवरील एकांकिका सादर करत आपल्या अभिनयकौशल्याचे दर्शन घडविले.

या स्पर्धेत नाट्य आराधना संस्थेने अंत्यकथा, नाट्य मल्हारने अय, न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजने पिसाळा, रसाभिनयने काही प्रॉब्लेम ये का..?, जनता विद्यालयाने मुंबई रिटर्न मंदी, पेमराज सारडा महाविद्यालयाने बिन रंगांची गोष्ट, सहज फाऊंडेशनने प्रेमळ, हाऊस फुल्लने नथिंग टू से, तर श्री साई नाट्यकला अकादमी, शिर्डी यांनी आत्मा कुडीच भांडण या एकांकिका सादर केल्या.

या स्पर्धेमुळे स्थानिक नाट्यसंस्था, महाविद्यालयीन कलाकार, लेखक आणि दिग्दर्शकांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. अशा स्पर्धांमुळे मराठी रंगभूमीची परंपरा समृद्ध होण्यासह नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळते.

सारडा महाविद्यालयाच्या बिन रंगांची गोष्ट या एकांकिकेची अंतिम फेरीसाठी निवड झाल्याने या संघाला पुढील फेरीत आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल या छोटाशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर

### अ‍ॅड. प्रमोद मेहेर यांचे प्रतिपादन; स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिरात १०८ रुग्णांची तपासणी



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन ईश्वरलाल मेहेर, अ‍ॅड.प्रमोद मेहेर, मनोज मेहेर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणीच्या काळापासूनच मी या सेवा कार्यात जोडला गेलो आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचा संकल्प ज्यावेळेस केला होता. त्यावेळी हॉस्पिटलला यश मिळेल का हा प्रश्न सर्वांना पडलेला होता. परंतु आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या नावाने हॉस्पिटल ची सुरुवात केली. तसेच जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य अत्यंत तळमळीने व सेवाभावी वृत्तीने आरोग्य सेवेच्या कार्यात योगदान देत असल्याने आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या छोटासा रोपट्याचे रूपांतर वटवृक्षात झाले आहे. आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे.

आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे. या मोफत आरोग्य शिबिरात मेहेर परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे माध्यमातून सेवा करण्याची भाग्य मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल ची कीर्ती सर्व दूर पसरली आहे, असे प्रतिपादन अ‍ॅड. प्रमोद मेहेर यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन ईश्वरलाल मेहेर, अ‍ॅड.प्रमोद मेहेर, मनोज मेहेर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी प्रशांत मेहेर, अ‍ॅड.सिद्धेश मेहेर, डॉ. अरविंद गुगळे, सौ. वंदना मेहेर, सौ.अंजली मेहेर, सौ.शैलजा गुगळे, सौ. संध्या मेहेर, सौ.पलक मेहेर, डॉ.रोहित गुगळे, डॉ.सपना गुगळे, चेतन गुगळे, सौ.कृष्णा पितळे आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया, संतोष बोथरा, सुभाष मुनोत, डॉ.आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.तृप्ती पाटील, डॉ.प्रथमेश झेंडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, कांतीलाल मेहेर यांनी गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांची सेवा केली आहे. त्यांनी वाचनालयातील धार्मिक पुस्तकांचा अनमोल ठेवा सांभाळला. त्यांनी मेहेर परिवारावर केलेले धार्मिक संस्कारातून च मेहेर परिवार हा धार्मिक कार्याशी जोडला गेला आहे. तसेच अ‍ॅड.प्रमोद मेहेर यांनी हॉस्पिटलच्या प्रशासकीय कार्यामध्ये वेळोवेळी सहकार्य केले आहे. हॉस्पिटलच्या उभारणीच्या काळात त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

मेहेर परिवारासारखे अनेक परिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात योगदान देत असल्याने वर्षभर विविध आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी भरविले जात आहेत. झोपडपट्टी, विणकर कामगार व बांधकाम कामगार करणाऱ्या गर्भवती महिला येथे उपचारासाठी येत असतात. कुपोषित बाळ जन्माला येऊ नये. यासाठी आरोग्य शिबिरांच्या मार्फत मार्च व ऑगस्ट दरम्यान मोठ्या प्रमाणात शिबिरे घेतली जातात. या शिबिराचा लाभ पाच ते सहा हजार रुग्ण घेतात. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी हे आचार्य आनंदऋषीजी महाराजांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य कार्यरत आहेत.

डॉ.प्रथमेश झेंडे म्हणाले, या शिबिरामध्ये स्त्री रोग व गर्भवती महिलांची मोफत तपासणी करण्यात येते. तसेच वंधत्व असणाऱ्या महिलांना ही या शिबिराच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येते. कुपोषित बालके जन्माला येऊ नयेत. यासाठी गर्भवती महिलांना आहाराविषयी योग्य ते मार्गदर्शन करण्यात येते. तसेच गरोदरपणाच्या काळात केल्या जाणाऱ्या सर्व तपासण्या सवलतीच्या दरात करण्यात येतात. या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.

शिबिरात १०८ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# 'कराओके असोसिएशन'ची अहिल्यानगरमध्ये स्थापना



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व कलाकारांच्या हितासाठी व त्यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी कराओके असोसिएशन ऑफ आर्टिस्ट फॉर म्युझिक या राज्यस्तरीय संस्थेच्या अहिल्यानगर शाखेची नुकतीच स्थापना करण्यात आली.

कराओके असोसिएशन ऑफ आर्टिस्ट फॉर म्युझिक, (काम) ही राज्यस्तरीय संस्था असून यात अध्यक्ष राजकुमार तिखे, वैजू चांडवले, आरती दीक्षित, प्रकाश सावंत इत्यादी गायक कलाकार कार्यकारणी सदस्य आहेत. राज्यभरातील कलाकारांना एकाच प्लॅटफॉर्मवर आणून त्यांच्या अडीअडचणी दूर करून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, शासकीय योजनांची त्यांना माहिती देणे, स्पर्धांचे आयोजन करणे इत्यादी उद्दिष्टे या संस्थेची आहेत.

अहिल्यानगर शाखेची स्थापना करताना नगर मधील ऋणानुबंध संस्थेचे अध्यक्ष अजित रोकडे यांचे काम संस्थेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. नुकतीच अहिल्यानगर मध्येही या संस्थेची सभा होऊन जिल्ह्यासाठी कार्यकारिणी तयार करण्यात आली. अहिल्यानगर मधील गायक डॉक्टर दमन काशीद यांची आणि प्रशांत बंडगर यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली तर सारिका रघुवंशी यांची कार्यकारी उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. आर्किटेक्ट व अनाम प्रेमचे अजित माने यांची सचिव तर सचिन परदेशी यांची खजिनदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. डॉक्टर शैलेंद्र खंडागळे व वैदेही बल्लाळ यांची संघटक पदी निवड करण्यात आली. नगर मधील गायक अजय दगडे, जुबेर शेख व आबीद खान यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या सभेत बोलताना अध्यक्ष अजित रोकडे म्हणाले की प्रशासनाकडून सर्व कलाकारांना नाट्यगृह व इतर सोयी सुविधा मिळवण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे तसेच कलाकारांच्या आर्थिक सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात येणाऱ्या अडी अडचणी सोडवण्यासाठी ही संस्था पाठबळ देण्याचा प्रयत्न करणार आहे. कलाकारांना तज्ञांकडून मार्गदर्शन, विविध कार्यक्रमांचे आयोजन, कलाकारांना विमा संरक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ इत्यादी बाबींसाठी संस्था कार्यरत राहणार आहे.

याप्रसंगी डॉक्टर दमन काशीद, अजित माने, प्रशांत बंडगर, अजय दगडे, डॉक्टर शैलेंद्र खंडागळे, वैदेही बल्लाळ, अबीद खान यांनी मार्गदर्शन केले.

जिल्ह्यातील गायक वादक नृत्य कलाकारांना संस्थेचे सभासद होण्यासाठी अध्यक्ष अजित रोकडे यांनी आवाहन केले आहे. व सभासद फॉर्म प्राप्त करण्यासाठी मोबाईल क्रमांक ९४२०६३५०९६ आणि ९४२२२२०१२३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री चौंडेश्वरी मंदिरात नवरात्रोत्सव साजरा



नगर – देवांग कोष्टी समाजसेवा मंडळाच्या नालेगाव भागामध्ये असलेल्या श्री चौंडेश्वरी देवी मंदिरात नवरात्र उत्सव कार्यक्रम मंगलमय वातावरणात पार पडला. या जागेवर गेल्या ७८ वर्षांपासून श्री चौंडेश्वरी देवीचे मंदिर आहे. घटस्थापनेच्या दिवशी विधिवत घटस्थापना झाल्यानंतर, नऊ दिवस विविध धार्मिक उपक्रम राबवण्यात आले. श्री चौंडेश्वरी भजनी मंडळ, वाडिया पार्क भजनी मंडळ व लक्ष्मीनगर भजनी मंडळ यांनी देवीच्या गाण्यांवर सुंदर भजनाचे कार्यक्रम आयोजित केले. श्रीराम भजनी मंडळ यांनी श्री दुर्गा सप्तशती पाठाचे वाचन केले. देवांगी महिला मंडळाने कुंकुमार्चन, भोंडला व जोगवा इत्यादी धार्मिक कार्यक्रम करत वातावरणात उत्साह भरला. सोमवारी अष्टमी निमित्ताने होमहवन व प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी समाजबांधव व परिसरातील भक्तांची मोठी उपस्थिती होती.

# आरोग्याची काळजी हाच निरोगी जीवनाचा पाया

### डॉ. श्रद्धा असोपा यांचे प्रतिपादन; जागर आरोग्याचा – मुख्यमंत्री आरोग्य संवाद उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागृती



डॉ. एन. जे. पाऊलबुधे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागर आरोग्याचा – मुख्यमंत्री आरोग्य संवाद या उपक्रमांतर्गत युवकांचे आरोग्य या विषयावर डॉ. श्रद्धा असोपा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

नगर – संतुलित आहार, नियमित दिनचर्या आणि निरोगी जीवनशैली यांचा आरोग्यावर होणारा परिणाम महत्त्वाचा आहे. आयुर्वेदाच्या दृष्टिकोनातून आरोग्याचे महत्त्व समजावून घेत दैनंदिन जीवनात आरोग्यपूरक सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. केवळ आजार झाल्यानंतर उपचार घेण्याऐवजी आरोग्य जपण्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. एन. जे. पाऊलबुधे आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राध्यापक डॉ. श्रद्धा असोपा यांनी केले.

युवकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, तसेच आयुर्वेदाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजावे, या उद्देशाने सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन. जे. पाऊलबुधे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागर आरोग्याचा – मुख्यमंत्री आरोग्य संवाद या उपक्रमांतर्गत युवकांचे आरोग्य या विषयावर डॉ. असोपा यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयीन युवतींचा प्रतिसाद लाभला. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थिनींना आरोग्याचे महत्त्व पटवून देण्याबरोबरच दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करण्याचा संदेश देण्यात आला. बदलती जीवनशैली, आहाराच्या सवयी आणि आरोग्याबाबतची जागरूकता या बाबी युवकांच्या जीवनात महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, हा या व्याख्यानामागील प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विनयनाथ पाऊलबुधे, संचालक साई पाऊलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे आणि तज्ज्ञ संचालक डॉ. रेखी खुराना यांचेही मार्गदर्शन लाभले. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा डावरे, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य सविता सानप तसेच विनायक मचा यांची यावेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे, प्राध्यापकवृंद आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रा. वसुधा देशपांडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. अमृता रत्नपारखी यांनी करून दिला, प्रा. उज्ज्वला आंबेडकर यांनी आभार मानले.



हिमकुंज मोटर्स (फोक्सवॅगन शोरूम) मध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर वाहनांचे वितरण करण्यात आले.

# हिमकुंज मोटर्समध्ये २१ फोक्सवॅगन गाड्यांची विक्री

नगर – अहिल्यानगर शहरातील एमआयडीसी परिसरातील हिमकुंज मोटर्स (फोक्सवॅगन शोरूम) मध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर ग्राहकांचा उत्साह पाहायला मिळाला असून, एकाच दिवसात तब्बल २१ चारचाकी वाहनांची विक्रमी विक्री झाली आहे.

दसऱ्याच्या मंगल मुहूर्तावर नवीन कार घरी नेण्याचे स्वप्न अनेक ग्राहकांनी साकार केले. फोक्सवॅगन वाहनांवरील विश्वास, आकर्षक सणासुदीच्या योजना, सोप्या फायनान्स सुविधा आणि ग्राहकाभिमुख सेवेमुळे खरेदीला उत्तम प्रतिसाद मिळाला. एकाच दिवसात झालेली २१ गाड्यांची विक्री ही हिमकुंज मोटर्सच्या दर्जेदार सेवेची पावती ठरली आहे.

ग्राहकांनी दाखवलेल्या या अढळ विश्वासाबद्दल व्यवस्थापनाने ग्राहकांचे आभार मानले असून, भविष्यातही अशीच गुणवत्तापूर्ण सेवा देण्याची ग्वाही दिली आहे.



नगर येथे ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते.

# नगरमध्ये ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

नगर – ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस व विचारांस अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या धम्मदीक्षेचे महत्त्व, समता, बंधुता आणि स्वातंत्र्याची मूल्ये यांवर प्रकाश टाकला.

या प्रसंगी बोलताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला तथागत गौतम बुद्ध यांचा जो धम्म दिला, तो मानवी मूल्ये, प्रज्ञा, शील आणि करुणेवर आधारित आहे. धम्म चळवळीचे पावित्र्य जपणे आणि बुद्धांच्या विचारांचा प्रचार–प्रसार करणे ही प्रत्येक धम्मसेवकाची आणि आंबेडकरी कार्यकर्त्याची आद्य कर्तव्य आहे. धम्म चळवळीत किंवा समाजात विचारांशी द्रोह करणाऱ्या किंवा घुसखोरी करणाऱ्या प्रवृत्तींना वैचारिक व सनदशीर मार्गाने धडा शिकवून चळवळ अधिक मजबूत करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

या अभिवादन सोहळ्यास भारतीय बौद्ध महासभेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, शहराध्यक्ष दीपक पाटोळे, भगवान गायकवाड, राहुल कांबळे, लक्ष्मण माघाडे, गोरख केदारे, गौतम पाचारणे, मोहन शिरसाठ, दीपक अमृत, अविनाश राक्षे, नितीन साळवे, माधवराव चाबुकस्वार, तसेच वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, देविदास भालेराव, प्रतीक जाधव यांच्यासह दोन्ही संघटनांचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नय्यर माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश



विविध जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश मिळविणाऱ्या नय्यर माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूंसमवेत मुख्याध्यापक, शिक्षक आदी. (छायाचित्र – दिगंबर कुटे)

नगर – अहिल्यानगर महापालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या विविध जिल्हास्तरीय स्पर्धेत नय्यर विद्यालयातील खेळाडूंनी विशेष प्राविण्य प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष व माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, गणेश केकाण, संचालक भास्करराव गोरे, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एकनाथ मोटे यांनी केले, तर संस्थेचे अध्यक्ष काका नय्यर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### विद्यालयाच्या ३ संघ व १३ खेळाडूंची विभागीय पातळीवर निवड

या स्पर्धेत खो–खो १४ वर्षे मुली, १७ वर्ष मुली (द्वितीय क्रमांक), १७ वर्षे मुले (तृतीय क्रमांक), बेसबॉल स्पर्धेत १९ वर्ष मुले व मुली (प्रथम क्रमांक), १७ वर्षे मुले व मुली (तृतीय क्रमांक), १४ वर्षे मुली (प्रथम क्रमांक), व्हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षे मुली व १७ वर्षे मुली (द्वितीय क्रमांक).

सॉफ्टबॉल स्पर्धेत १९ वर्षे मुली (द्वितीय क्रमांक), १४ वर्षे मुले व १७ वर्षे मुली (तृतीय क्रमांक), थ्रो बॉल स्पर्धेत १४ वर्षे मुले, १७ वर्षे मुले, १९ वर्षे मुले, १९ वर्षे मुली संघ (तृतीय क्रमांक), आट्यापाट्या स्पर्धेत १७ वर्षे मुले (प्रथम क्रमांक), १७ वर्षे मुली, १९ वर्षे मुले व मुली (द्वितीय क्रमांक) पटकावला, तर वैयक्तिक स्पर्धेत अनय महामुनी बुद्धिबळ स्पर्धेत (तृतीय क्रमांक), वेटलिफ्टिंग स्पर्धेत साहिल कसोटे व साई पोपळे (प्रथम क्रमांक), तायक्कांदो स्पर्धेत ईश्वरी ढाकणे व पायल खामकर (द्वितीय क्रमांक), तलवारबाजी – ओम नागरगोजे (तृतीय क्रमांक), गोळाफेक– श्रावणी कावळे (प्रथम क्रमांक), २०० मीटर धावणे – भक्ती पालवे (प्रथम क्रमांक), १०० मीटर धावणे – स्वरा क्षीरसागर (द्वितीय क्रमांक), ६०० मीटर धावणे– साईराज कोल्हे (तृतीय क्रमांक), लांब उडी (द्वितीय क्रमांक), २०० मीटर व ४०० मीटर धावणे– प्रिया गव्हाणे (तृतीय क्रमांक), ४०० मीटर धावणे– गौरव म्हस्के (तृतीय क्रमांक), थाळीफेक– आरती जगताप (तृतीय क्रमांक), ८०० मीटर धावणे– अंजली विश्वकर्मा (तृतीय क्रमांक), २०० मीटर धावणे– तेजश्री मिसाळ (तृतीय क्रमांक), हातोडा फेक– स्वराज भताने (तृतीय क्रमांक), हातोडा फेक– साई पोपळे (द्वितीय क्रमांक), हातोडा फेक– नियती घोडके (प्रथम क्रमांक), हातोडाफेक– वारे सिद्धी (द्वितीय क्रमांक), हातोडा फेक– शिरसाठ सिद्धी (द्वितीय क्रमांक), हातोडा फेक– आरती गीते (तृतीय क्रमांक), लांब उडी– माधुरी माधुरी (तृतीय क्रमांक), लांबउडी जगताप आरती (तृतीय क्रमांक).

स्कॅवेश स्पर्धेत साईराज कोल्हे, गीते आरती, वारे सिद्धी, ओम नागरगोजे, पालवे रोहित, कसोटी साहिल, माधुरी झिपुर्डे यांची विभागीय स्पर्धेत निवड झाली, तसेच नियती घोडके, साहिल कसोटे, साई पोकळे, श्रावणी कावळे, पालवे भक्ती, स्वरा क्षीरसागर यांची विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली आहे, तर खो–खो स्पर्धा १४ वर्षे मुली व १७ वर्षे मुली व आट्यापाट्या १७ वर्षे मुले यांची विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, क्रीडा शिक्षक संतोष नागरगोजे व क्रीडा मार्गदर्शक अजय जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## नवऱ्याला भारतीय महिला काय म्हणतात?

भारत हा असा देश आहे जिथे दर काही किलोमीटरवर बोली, भाषा, बोलण्याची पद्धत बदलत असते. मराठी, हिंदी, गुजराती, तमिळ, तेलुगू, हरियाणवी, राजस्थानी अशा अनेक भाषा आपल्याला या देशात ऐकायला मिळतात. त्यातही काही शब्द, त्यांचे उच्चार वेगळे असतात; मात्र एवढा फरक असूनही सगळे, प्रेमाने, आपुलकीने बोलतात, वागतात हेच या देशाचे सामर्थ्य आहे. एकाच शब्दाची विविध रूपंही इथे आपल्या कानी पडतात.

आता पती किंवा नवरा हाच शब्द घ्या ना.. आपल्याकडे काही ठिकाणी 'अहो' म्हणतात, तर काही ठिकाणी 'सैंया' हाक मारतात. तर दुर्स?या गावी , राज्यात त्यांना बलमुआ, बींद असंही म्हटलं जातं. म्हणजेच शब्द एक, अर्थही एक, पण त्याला नावं वेगवेगळी. प्रत्येक राज्यात आणि भाषेत प्रेमाची वेगळी बोली असू शकते, अनोखी पद्धत असते; पण भाव तोच असतो. भारतातल्या कोणत्या राज्यात पतीला काय म्हणतात, हे तुम्हाला माहीत आहे का? चला जाणून घेऊया.



उत्तर प्रदेशात, पतीला 'बलमुआ' म्हणतात. हा शब्द प्रेमाची भावना जागृत करतो. तो गोड आणि जवळचा, आपलासा वाटणारा आहे. बिहारमध्ये पतीला 'सइयां' म्हणतात. हा शब्द प्रेम आणि आपुलकी दोन्ही दर्शवतो. भोजपुरी गाण्यांमध्येही 'सइयां' हा शब्द वारंवार ऐकायला मिळतो. राजस्थानमध्ये पतीला बिंद म्हणतात. याचा अर्थ जीवनसाथी. हरियाणामध्ये पतीला भरतार म्हणतात. महाराष्ट्रात पतीला 'नवरा' असं म्हणतात. पंजाबमध्ये पतीला 'खासम' म्हणतात. हिमाचल प्रदेशात पतीला 'पौणे' म्हणतात. छत्तीसगडमध्ये पतीला प्रेमाने 'SCHm' म्हटले जाते. पश्चिम बंगालमध्ये पतीला 'स्वामी' म्हटले जाते. हा शब्द मोठ्या आदराने वापरला जातो. उत्तराखंडमध्ये पतीला 'बैग' म्हणतात. बिहारप्रमाणेच जम्मू आणि काश्मीरमध्ये देखील पतीला 'सइयां' असं म्हणतात. ओडिशामध्ये पतीला भर्ता म्हणतात. झारखंडमध्ये पतीला फक्त 'पती' असंच म्हटलं जातं.

◆◆◆

## झाडाला ७२ तास आलिंगन

केनियाची २२ वर्षीय पर्यावरण कार्यकर्ती टूफेन मुथोनी हिने सलग तब्बल ७२ तास झाडाला आलिंगन देण्याबाबत 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस्' मध्ये आपले नाव नोंदवले आहे. 'सर्वात लांब मॅरेथॉन ट्री-हगिंग' श्रेणीत तिने हा विश्वविक्रम प्रस्थापित केला.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस्ने दिलेल्या माहितीनुसार, टूफेनने हे यश ८ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२५ दरम्यान मिळवले. न्येरी येथील गव्हर्नर कार्यालय परिसरात ११ डिसेंबर रोजी दुपारी १२.२५ वाजता तिने ७२ तासांचा हा टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला. केवळ प्रसिद्धीसाठी नव्हे, तर एका उदात्त हेतूने टूफेनने हे आव्हान स्वीकारले होते : स्थानिक वृक्षांचे संरक्षण : स्थानिक झाडांच्या रक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे. आदिवासी ज्ञानाचा सन्मान : हवामान संकटाशी लढण्यासाठी आदिवासी समुदायांकडे असलेल्या पारंपरिक ज्ञानाला महत्त्व देणे. निसर्गाशी नाते : पर्यावरण संरक्षण ही केवळ जबाबदारी नसून ती एक आवड (पॅशन) बनावी, यासाठी लोकांना निसर्गाशी जोडणे. टूफेनने ट्री-हगिंग मॅरेथॉनमध्ये जागतिक ओळख मिळवण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ दरम्यान तिने नैरोबीमध्ये ४८ तास झाडाला मिठी मारून रेकॉर्ड केला होता. आता ७२ तासांचा विक्रम करत तिने स्वतःचाच जुना रेकॉर्ड २४ तासांच्या फरकाने मोडीत काढला आहे.



यापूर्वी हा विक्रम घानाचा अब्दुल हकीम अवाल याच्या नावावर होता, ज्याने मे २०२४ मध्ये २४ तास २१ मिनिटे झाडाला मिठी मारली होती. ७२ तास सलग उभे राहून झाडाला मिठी मारणे सोपे नव्हते. यासाठी टूफेनने पाच महिने सराव केला होता. यामध्ये ४२ किलोमीटरच्या पदयात्रा आणि सलग १२ तास झाडाला बिलगून राहण्याच्या सरावाचा समावेश होता. निसर्गाशी सान्निध्यात राहण्याचे मानसिक आणि भावनिक फायदे जगाला दाखवून देणे हा तिचा प्रयत्न होता. विक्रमाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर टूफेनने फेसबुकवर 'लोकांसाठी आणि पृथ्वीसाठी' अशी भावना व्यक्त केली. सोशल मीडियावर तिच्या या धाडसी पावलाचे पर्यावरण प्रेमींकडून मोठे कौतुक होत आहे.

◆◆◆

## आता कपडेच बनणार कॉम्प्युटर

तंत्रज्ञानाच्या जगात चीनने पुन्हा एकदा आपली छाप पाडली आहे. शांघायमधील फुडन युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी मानवी केसांइतकी पातळ आणि लवचिक 'फायबर चिप' तयार करण्यात यश मिळवले आहे. या शोधामुळे आता तुमचे कपडे केवळ शरीर झाकण्यासाठीच नव्हे, तर कॉम्प्युटर आणि डिस्प्लेप्रमाणे काम करू शकणार आहेत.

प्राध्यापक पेंग हुइशेंग यांच्या नेतृत्वाखालील टीम गेल्या १० वर्षांपासून यावर संशोधन करत होती. त्यांनी सिलिकॉनच्या कडक आणि सपाट चिप्सऐवजी लवचिक धाग्यांमध्येच संपूर्ण इलेक्ट्रॉनिक सर्किट बसवले आहे. याला 'फायबर इंटीग्रेटेड सर्किट' (FIC) असे नाव देण्यात आले आहे. या धाग्यामध्ये प्रति सेंटीमीटर १,००,००० ट्रांजिस्टर बसवण्यात आले आहेत. एक मीटर लांब धाग्याची क्षमता एखाद्या आधुनिक कॉम्प्युटरच्या सीपीयू इतकी असू शकते. यात केवळ वीजपुरवठाच नाही, तर रेसिस्टर,



कॅपेसिटर, डायोड आणि ट्रांजिस्टर देखील आहेत. हे डिजिटल आणि ॲनालॉग दोन्ही प्रकारचे सिग्नल प्रोसेस करू शकतात. या चिप्सना १०,००० वेळा वाकवले किंवा रगडले तरी त्या खराब होत नाहीत. त्या १८० अंशांपर्यंत मुडू शकतात आणि ३० टक्क्यांपर्यंत ताणल्या जाऊ शकतात. सर्वसामान्य इलेक्ट्रॉनिक वस्तू पाण्याने खराब होतात, पण हे 'स्मार्ट कपडे' मशिनमध्ये १०० पेक्षा जास्त वेळा धुतले तरी व्यवस्थित काम करतात. टेस्टिंग दरम्यान, १०० अंश सेल्सिअस तापमान सहन करण्यासोबतच, १५.६ टन वजनाच्या ट्रकखाली दबल्यानंतरही हे फायबर चिप्स पूर्णपणे सुरक्षित आणि कार्यरत आढळले. आतापर्यंत स्मार्ट कपड्यांमध्ये जड बॅटरी किंवा बाहेरून चिप्स लावाव्या लागत. मात्र, या नवीन तंत्रज्ञानामुळे कपड्याचा धागाच स्वतः सेन्सिंग, कॉम्प्युटिंग आणि डिस्प्लेचे काम करेल. भविष्यात अशा कपड्यांची निर्मिती होईल जे तुमचे आरोग्य मोजू शकतील, संदेश दाखवू शकतील आणि कॉम्प्युटरप्रमाणे वापरता येतील. नॅनोमीटर-स्केल फोटोलिथोग्राफीच्या मदतीने भविष्यात या ट्रांजिस्टर्सची संख्या वाढवून या कपड्यांना सुपर कॉम्प्युटर इतके वेगवान बनवण्याचा शास्त्रज्ञांचा मानस आहे.

◆◆◆

## समुद्राखालील जगातील सर्वात लांब बोगदा

बाल्टिक समुद्राच्या खाली डेन्मार्क आणि जर्मनीला जोडणारा एक ऐतिहासिक आणि विक्रमी बोगदा बांधला जात आहे. 'फेहमार्नबेल्ट' नावाचा हा १८ किलोमीटर लांब बोगदा स्कॅन्डिनेव्हियन देशांना उर्वरित युरोपशी जोडण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. विशेष म्हणजे, हा जगातील सर्वात लांब 'प्री-फॅब्रिकेटेड' (आधीच तयार केलेला) रस्ते आणि रेल्वे बोगदा असेल.

**'लेगो'सारखी जोडणी**

सहसा समुद्राखालील बोगदे (उदा. ब्रिटन आणि फ्रान्समधील चॅनल टनेल) जमिनीच्या खाली खोदकाम करून बनवले जातात. मात्र, फेहमार्नबेल्टचे तंत्र वेगळे आहे. येथे बोगद्याचे ९० महाकाय भाग जमिनीवर तयार करून ते समुद्राच्या तळावर एकमेकांना जोडले जाणार आहेत, अगदी एखाद्या 'लेगो' ब्लॉकप्रमाणे.

**प्रवासाचा वेळ तासांवरून मिनिटांवर**

हा बोगदा पूर्ण झाल्यावर प्रवासाच्या वेळात मोठी बचत होईल : सध्या रॉडबीहावन (डेन्मार्क) ते पुटगार्टन (जर्मनी) दरम्यान फेरीने जाण्यासाठी ४५ मिनिटे लागतात; बोगद्यामुळे हे अंतर कारने १० मिनिटांत आणि ट्रेनने ७ मिनिटांत पार करता येईल. कोपनहेगन ते हॅम्बुर्ग हा ५ तासांचा रेल्वे प्रवास अडीच तासांवर येईल.



**पर्यावरणपूरक आणि सुरक्षित पर्याय**

फेमर्न कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हेन्रिक विन्सेंटसेन यांच्या मते, हा प्रकल्प केवळ दोन देशांना जोडणारा नाही, तर कार्बन उत्सर्जन कमी करणारा 'ग्रीन' पर्याय आहे. १६० कि.मी.चा वळसा कमी झाल्यामुळे इंधनाची बचत होईल आणि विमान प्रवासाची गरज कमी होईल. सुरुवातीला येथे पूल बांधण्याचा विचार झाला होता; पण बाल्टिक समुद्रातील वेगवान वारे आणि मोठ्या जहाजांच्या धडकेची भीती लक्षात घेता, समुद्राखालील बोगद्याचा निर्णय घेण्यात आला. येथील समुद्राचा तळ मऊ मातीचा असल्याने बोरिंग मशिनने खोदकाम करणे कठीण होते, म्हणून 'इमर्स्ड टनेल' (Immersed Tunnel) हे प्रगत तंत्रज्ञान वापरले जात आहे.

**अतिशय सूक्ष्म काम**

बोगद्याचे हे अवाढव्य भाग समुद्रात ४० मीटर खोलीवर सोडले जातात. जीपीएस (ऋझड) आणि अंडरवॉटर कॅमेऱ्यांच्या मदतीने ते १५ मिलिमीटरच्या अचूकतेने एकमेकांना जोडले जातात. 'आम्हाला अतिशय सावधगिरी बाळगावी लागते,' असे बांधकाम व्यवस्थापक अँडर्स गर्ट वेडे यांनी सांगितले. हा प्रकल्प युरोपियन युनियनच्या वाहतूक जाळे मजबूत करण्याच्या योजनेचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि यामुळे भविष्यात संपूर्ण युरोपमधील व्यापार आणि पर्यटनाला नवी गती मिळेल.

**प्रमुख वैशिष्ट्ये :**

**लांबी :** १८ किलोमीटर (११ मैल). **खर्च :** सुमारे ७.४ अब्ज युरो (अंदाजे ६७,००० कोटी रुपये). **रचना :** एका भागात पाच स्वतंत्र नळ्या (Tuber) असतील- दोन रेल्वेसाठी, दोन चौपदरी रस्त्यासाठी आणि एक आपत्कालीन मार्गासाठी. **वजन :** बोगद्याचा एक भाग तब्बल ७३,००० टन वजनाचा आहे.

◆◆◆

## मंगळावर होता महासागर

अंतराळात लाल रंगाने चमकणारा मंगळ ग्रह नेहमीच असा 'लाल' नव्हता. शास्त्रज्ञांनी केलेल्या एका खळबळजनक खुलाशानुसार, सुमारे ३ अब्ज वर्षांपूर्वी मंगळ हा पृथ्वीसारखाच एक 'निळा ग्रह' होता. नवीन संशोधनात मंगळावर पृथ्वीवरील आर्क्टिक महासागराच्या आकाराचा एक विशाल समुद्र आणि नद्यांचे जाळे अस्तित्वात असल्याचे पुरावे सापडले आहेत.



मंगळावर पाणी असल्याचे संकेत यापूर्वीही मिळाले होते; परंतु ते किती अवाढव्य होते हे आता स्पष्ट झाले आहे. संशोधकांच्या मते, प्राचीन काळी मंगळाचा अर्धा भाग महासागराने व्यापलेला होता. हा समुद्र आपल्या उत्तर ध्रुवावरील आर्क्टिक महासागराएवढा विशाल असावा, असा अंदाज आहे. युनिव्हर्सिटी ऑफ बर्न येथील संशोधक इग्नेशियस अर्गाडिस्त्या यांनी सांगितले की : 'आपण आज मंगळाला कोरडा आणि लाल ग्रह म्हणून ओळखतो. मात्र, आमचे परिणाम दर्शवतात की तो पूर्वी पृथ्वीसारखाच निळा ग्रह होता. हाय-डेफिनिशन उपग्रह फोटोंच्या मदतीने आम्ही तेथील भूभागाचे बारकाईने नकाशे तयार केले आहेत.' मंगळाभोवती फिरणाऱ्या ऑर्बिटरने घेतलेल्या उच्च दर्जाच्या छायाचित्रांचे विश्लेषण केल्यावर शास्त्रज्ञांना काही धक्कादायक साम्य आढळले : नद्यांचे त्रिभुज प्रदेश (डेल्टा) : मंगळावरील काही संरचना पृथ्वीवरील नद्यांच्या मुखाशी तयार होणाऱ्या 'डेल्टा' सारख्याच आहेत. सागरी किनारपट्टी : संशोधकांना अशा खुणा सापडल्या आहेत ज्या दर्शवतात की, एकेकाळी तिथे नद्यांचे पाणी महासागराला जाऊन मिळत होते. कॅन्यन सिस्टम: विशाल दऱ्या आणि पर्वत हे पृथ्वीवरील डोंगराळ भागांशी साधर्म्य दर्शवतात.

आज मंगळावरील या नद्यांच्या आणि समुद्राच्या जागी वाळूचे ढिगारे पसरलेले असले, तरी त्यांचा मूळ आकार आजही स्पष्टपणे ओळखता येतो. पाणी हे जीवसृष्टीसाठी सर्वात महत्त्वाचा घटक मानले जाते. मंगळावर इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी अस्तित्वात होते, याचा अर्थ तिथे कधीकाळी जीवसृष्टी असण्याची दाट शक्यता आहे. या शोधामुळे अंतराळ संशोधकांना मंगळावर सजीवांचे अस्तित्व शोधण्यासाठी आता अधिक बळ मिळणार आहे. हे संशोधन "npj Sppace Exploration' या प्रसिद्ध जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.

◆◆◆

## वऱ्हाड निघालंय बर्फातून!

हिमाचल प्रदेशात गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या तुफानी हिमवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. रस्ते बंद झाल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. मात्र, अशा कठीण परिस्थितीतही एका नवरदेवाने दाखवलेल्या हिमतीची आणि परंपरेची चर्चा सध्या संपूर्ण परिसरात रंगली आहे. मंडी जिल्ह्यातील सराज विधानसभा क्षेत्रात एका नवरदेवाने चक्क सात किलोमीटर बर्फातून पायपीट करत लग्नस्थळ गाठले.

मंडी जिल्ह्यातील केओली पंचायतीच्या बुनालीधार गावातील गितेश ठाकूर आणि भैंचडी गावातील उषा ठाकूर यांचा विवाह २४ जानेवारी रोजी निश्चित झाला होता. मात्र, लग्नाच्या



आदल्या दिवशी म्हणजे २३ जानेवारीला भागात प्रचंड हिमवृष्टी झाली. दोन्ही गावांमध्ये सुमारे ३ ते ४ फूट बर्फ साचला, रस्ते बंद झाले आणि चालण्याचे मार्गही बर्फाच्या जाड थराखाली गाडले गेले. स्थानिक रीतीरिवाजांनुसार ठरलेली लग्नाची तिथी बदलणे अशुभ मानले जाते. हीच परंपरा जपण्यासाठी नवरदेव गितेश आणि वऱ्हाडी डगमगले नाहीत. नवरदेव आणि वऱ्हाडी बुनालीधार गावातून पायी निघाले. गुडघाभर बर्फातून वाट काढत त्यांनी ७ किलोमीटरचे अंतर पार केले. हा प्रवास पूर्ण करण्यासाठी त्यांना सुमारे ३ ते ४ तास लागले. लग्न लागल्यानंतर नवरीला सासरी नेण्याचे मोठे आव्हान होते.

डोंगराळ भागात पालखीची परंपरा असते; पण निसरड्या वाटांमुळे पालखी नेणे धोकादायक होते. त्यामुळे नवरी उषा ठाकूर यांनीही कोणताही धोका न पत्करता वऱ्हाडासोबत ७ किलोमीटर पायी चालण्याचा निर्णय घेतला. हाडे गोठवणाऱ्या थंडीत आणि चहूबाजूंनी असलेल्या बर्फाच्या पांढऱ्या चादरीत हा विवाह सोहळा अत्यंत साधेपणाने पार पडला. सर्व विधी पूर्ण झाल्यानंतर नवरीने नवरदेवाचा हात धरून बर्फाळ वाटांवरून चालत आपल्या सासरी प्रवेश केला. येण्या-जाण्याचा मिळून हा एकूण १४ किलोमीटरचा प्रवास या जोडप्यासाठी आणि वऱ्हाड्यांसाठी आयुष्यभर स्मरणात राहणारा ठरला आहे. या अनोख्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, प्रतिकूल परिस्थितीतही परंपरा जपणाऱ्या या कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

◆◆◆



## स्टोनहेंजचे दगड कोणी आणले?

दक्षिण इंग्लंडमधील 'स्टोनहेंज' या ५,००० वर्षे जुन्या ऐतिहासिक स्मारकाबाबत शास्त्रज्ञांनी एक मोठा खुलासा केला आहे. एका नवीन संशोधनानुसार, या स्मारकासाठी वापरलेले महाकाय दगड हिमनद्यांच्या नैसर्गिक प्रवाहाने आले नसून, ते मानवांनीच शेकडो मैल दूरवरून वाहून आणले होते, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. दशकांपासून शास्त्रज्ञांमध्ये असा वाद होता की, वेल्स आणि स्कॉटलंडमधून हे दगड सॅलिसबरी प्लेनपर्यंत कसे पोहोचले? काही तज्ज्ञांच्या मते, हिमयुगातील ग्लेशियर्स म्हणजेच हिमनद्यांनी हे दगड नैसर्गिकरीत्या वाहून आणले असावेत, ज्याला 'ग्लेशियल ट्रान्सपोर्ट थिअरी' म्हटले जाते. मात्र, 'कम्युनिकेशन्स अर्थ अँड एन्व्हायर्नमेंट' या शोधपत्रिकेत २१ जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या अभ्यासाने हा दावा फेटाळून लावला आहे. ऑस्ट्रेलियातील कर्टिन युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी स्टोनहेंज परिसरातील नद्यांच्या गाळातील 'झिरकॉन' आणि 'ॲपेटाइट' या सूक्ष्म खनिजांचे विश्लेषण केले. या खनिजांच्या वयाची तुलना केली असता, ती वेल्स किंवा स्कॉटलंडमधील खडकांशी जुळली नाहीत. उलट, ही खनिजे स्थानिक खडकांचेच अवशेष असल्याचे स्पष्ट झाले. जर हिमनद्यांनी हे दगड आणले असते, तर वाटेत त्या खडकांचे सूक्ष्म कण सॅलिसबरी प्लेनमध्ये विखुरलेले आढळले असते. मात्र, तसे कोणतेही पुरावे सापडले नाहीत. या संशोधनामुळे एक आश्चर्यकारक सत्य समोर आले आहे. स्टोनहेंजमधील 'ब्लूस्टोन्स' हे सुमारे २२५ किलोमीटर लांब असलेल्या वेल्समधून आणले गेले होते. त्याहून अधिक थक्क करणारी बाब म्हणजे, मधील 'अल्टर स्टोन' हा उत्तर इंग्लंड किंवा स्कॉटलंडमधून आणला असावा, ज्याचे अंतर किमान ५०० किलोमीटर आहे.

संशोधक अँथनी क्लार्क यांच्या मते, 'आमच्या अभ्यासाने अत्याधुनिक 'मिनरल फिंगरप्रिंटिंग' तंत्राचा वापर करून दगडांच्या मूळ स्थानाचा शोध घेतला आहे. हिमनद्या दक्षिण इंग्लंडपर्यंत पोहोचल्याच नव्हत्या, याचा अर्थ हे सहा टनांचे दगड मानवांनीच जमीन आणि कदाचित बोटींच्या सहाय्याने येथे आणले होते.' हे संशोधन सिद्ध करते की, ५,००० वर्षांपूर्वीच्या मानवाकडे अत्यंत प्रगत अभियांत्रिकी कौशल्य आणि संघटन शक्ती होती. नैसर्गिक मदतीशिवाय केवळ स्वतःच्या कष्टाने आणि नियोजनाने त्यांनी हे महाकाय दगड इतक्या लांबून आणून हे भव्य स्मारक उभे केले.

◆◆◆

# आनंदतीर्थाचे काम लवकरच पूर्ण होणार

नगर – अहिल्यानगरपासून अवघ्या तीस किलोमीटर अंतरावर राष्ट्र संत आनंदऋषीजी महाराज यांच्या जन्मगावी विविध मंदिर, प्रशासकीय इमारत, भक्तनिवास, भोजनालय अश्या विविध इमारतींची कामे चिचोंडी शिराळ येथे मागील दहा वर्षापासून चालू आहेत. आपल्या शहरापासून जवळच सुबक, आकर्षक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चालू असलेल्या कामांना ऑर्किटेक्ट, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर असोसिएशन (एसा) संस्थेच्या वतीने भेट देण्याचे नियोजन ट्रस्टची परवानगी घेऊन करण्यात आले होते. संस्थेच्या जवळपास ७० आर्किटेक्ट, इंजिनीअर्स आणि त्यांचे कुटुंबीय यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. या परिसरात शमोशरण तीर्थ, नावकार कलश तीर्थ, गुरु चरण तीर्थ अश्या जैन समाजाच्या दृष्टीने पवित्र मंदिरांचे स्थापत्य कलेच्या दृष्टीने आताच्या काळातील सर्वोत्कृष्ट बांधकामे उभारण्याचे काम चालू आहे.

संस्थेच्या सभासदांनी पॉंडिचेरी येथील २०१० साली मातृ मंदिराच्या धर्तीवर उभारण्यात आलेले लोटस टेम्पलला स्टडीटूर द्वारे भेट दिली होती. याच धर्तीवर चिंचोडी येथे साकारण्यात येत असणारे गुरू चरण तीर्थ हे या अभ्यास दौऱ्याचे मुख्य आकर्षण होते. भारतातील सुप्रसिध्द आर्की, देवेंद्र सोमपूरा यांनी गुरू चरण तीर्थ या मुख्य मंदिराचे प्लॅनिंग केले आहे. जवळपास ३०,००० चौ फूट क्षेत्राचा बिल्ट अप, मधील केंद्रस्थानी ८० फूट उंच. स्टील ऐवजी एफ आर पी बार चा वापर आणि ८० एम पी ए ताकदीचे कॉंक्रिट, ग्रीड स्लॅब , प्रचंड पाकळ्यासाठी वापरलेले फेरो सिमेंट सारखे तंत्रज्ञान, तसेच नैसर्गिक ए सी कुलर सिस्टीमसाठी कौलारू प्लेट मधून पाणी आणि हवा वाहून जाण्यासाठी केलेली योजना. अश्या विविध छटा या इमारतीमध्ये दिसून आल्या. एंट्री जवळील एसा संस्थेचे प्रितेश गुगळे यांनी प्लॅनिंग केलेले आणि शाम गुलाटी धनेश मुनोत यांनी साकारलेली प्रशासकीय इमारत तसेच तेथील ऑडियोटोरियम हॉल लक्ष वेधून जातो. त्यानंतर भक्त निवास आणि भोजन कक्ष ज्याचे काम प्रमोद बेरी यांच्या कामाची छाप दर्शवितो.

अहिल्यानगरपासून जवळ असलेल्या चिचोंडीसारख्या खेडेगावात

**एसा सभासदांची चिचोंडी शिराळ येथील आनंदतीर्थला भेट**





इतक्या मोठ्या प्रमाणात वास्तू विशारद, अभियांत्रिकीचा, लँडस्केप यांचा आविष्कार असणारे काम पाहण्यास मिळणे ही संस्थेच्या उपस्थित सभासदांसाठी मोठ्या समाधानाची बाब होती. आनंद तीर्थ प्रकल्प भेट अतिशय ज्ञानवर्धक सर्वांना प्रेरणादायी तसेच भक्तिमय वातावरणात पार पडली. गुरुआनंद फाउंडेशन ट्रस्ट मार्फत शहरापासून जवळ अतिशय उच्च दर्जाचे काम पाहण्यास मिळणे हा सर्व एसा सभासदांसाठी आश्चर्याचा सुखद धक्काच होता. प्रवेश द्वाराजवळील इमारतीपासून, भक्त निवास, गुरू चरण मंदिर, ध्यान केंद्र मंदिर, कलश मंदिर अशी विविध स्ट्रक्चर आणि त्यांची कामे आमच्या आर्किटेक्ट इंजिनीअर्स यांच्या दृष्टीतून पाहण्यासारखी आहेत. सर्वांना तेथील वातावरण, लँडस्केप, आर्कीटेक्चरल सौंदर्य आणि सिव्हिल इंजिनीअरिंग मधील कामांची गुणवत्ता प्रभावित करणारी आहेत.

त्याचबरोबर रस्त्यांची कामे, लेव्हल, रंगसंगती, शिस्त, भोजन व्यवस्था उच्च दर्जाची आहेत. आनंदतीर्थ येथील सर्व अधिकारी आणि स्टाफने अतिशय चांगली वागणूक एसा सभासदांना दिली. गुरुआनंद फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष सी ए सतीश सुराणा, ट्रस्टी अशोक पितळे , ट्रस्टी सुनील नहार यांचे हे सर्व स्ट्रक्चर्स उभारणीत मागील दहा वर्षांपासून भरीव योगदान आहे. आनंद तीर्थ वरील भेटीच्या निमित्ताने आम्हाला सिव्हील इंजिनियरिंग क्षेत्रातील एक चांगले स्थापत्य शिल्प पाहण्याची आणि तांत्रिक स्टाफ कडून त्याची तांत्रिक माहिती करून दिल्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. आनंदतीर्थ येथील व्यवस्थापक संजय गुगळे, तेथील तांत्रिक काम पाहणारे प्रविण वाकचौरे आणि सुमित कुमावत यांनी कामास वापरलेले साहित्य, वेगवेगळ्या इमारतींचे प्लॅनिंग केलेले आर्किटेक्ट, कामासाठचे आधुनिक तंत्रज्ञान याविषयी उपयुक्त माहिती एसाच्या आर्किटेक्ट आणि इंजिनीअर्स यांना दिली. या सर्व आयोजनात संस्था सभासद कविता जैन, प्रितेश गुगळे आणि दादासाहेब बेरड यांचे सहकार्य लाभले. तसेच गुरू आनंद फाउंडेशनचे ट्रस्टी अशोक पितळे यांनी सहकार्य केले.

या उपक्रमास संस्था अध्यक्ष प्रदिप तांदळे, सचिव भूषण पांडव, उपाध्यक्ष सुनिल औटी, संतोष खांडेकर, सुनिल जाधव, गौरव मांडगे, सचिन डागा, सागर ढगे, अमोल येनगंदूल आणि सभासद उपस्थित होते.



## गुरुवाणी – ८९

### आतील प्रभू जागृत करा

कपिलने गतजन्मीची प्रतिज्ञा करण्यासाठी गीत गायले. पाचशे चोर गतजन्मी परम ज्ञान प्राप्त करण्यासाठी साधना करत होते. ते ठरवतात ज्याला प्रथम परम ज्ञान प्राप्त होईल तो इतर सर्वांना ज्ञान देईल. कपिलही आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मार्गस्थ झाला. कपिल अध्ययन करत असताना एका दासीच्या प्रेमात पडतो. तो विचलित होतो. कपिलने राजाला सर्व आत्मकथा सांगितली. स्वतः चे सगळे गुण अवगुण सहजपणे सांगितले. जो स्वतःशी प्रामाणिक असतो तो श्रेष्ठ होऊ शकतो. राजा कपिलला हवं ते मागण्यास सांगतो. कपिल जे काही मागण्याचा विचार करतो तिथे त्याला धोका दिसतो. तो पूर्ण राज्य मागायचा विचार करतो आणि त्याला झटका बसतो. 'जो माझ्यावर कृपा करत आहे, मी त्यालाच उद्ध्वस्त करतोय'. विचाराअंती त्याची गतजन्मीची साधना जागृत झाली. त्याला परमज्ञान झाले. त्याला गतजन्मीचे डाकू मित्र आठवले आणि तो जंगलात गेला. डाकूंनी त्याला आपल्या प्रमुखाकडे नेले. कपिल अजिबात भयभीत नव्हता. त्याने गीत गाणे सुरू केले. ते ऐकून सर्व डाकूंमध्येही परिवर्तन झाले. डाकू सुद्धा मोहमुक्त झाले. जे भोगासक्त होतात ते पक्ष्याप्रमाणे जाळ्यात अडकतात. एकदा त्यात अडकला की पुन्हा उडता येत नाही. कालांतराने त्यांना अहितच हितकारक वाटते. कपिलने जे उत्तराध्ययन गीत गायले ते तुम्ही सुद्धा घर परिवारात गा. मणिरथ राजाची कथाही उद्बोधक आहे. त्याची नजर भावाच्या सुंदर पत्नीवर मदनरेखावर पडते. तो युगबाहूचा अडथळा दूर करण्याचे ठरवून एका रात्री भावावर प्राणघातक हल्ला करतो पण युगबाहूची पत्नी जागी होते आणि मणिरथ पलायन करतो. पण पळताना त्याला विषारी सर्प दंश होतो. तो जागेवरच मरतो. इकडे युगबाहू अखेरच्या घटका मोजत असतो. मदनरेखा पतीला सांगते, तुम्ही क्षमाशील होऊन प्रभूंच्या शरणात जा. ती पतीला संथारा देते. काही काळाने तिला मूल होते. एकेदिवशी मिथिलेचा राजा त्या बाळाजवळ जातो. तो निपुत्रिक असतो.

बाळ त्याला बिलगते. तो बाळाला राजनगरीत नेतो. राणीला सांगतो हा तुझा पुत्र नमि. नमि मिथिलेचा राजा बनतो. पुढे नमिला भयानक आजार होतो. त्याला आतमध्ये प्रचंड कोलाहल जाणवतो. तो स्वतःला प्रश्न विचारतो, मी कोण आहे? त्याला गतजन्मीची साधना आठवते. तो पूर्ण बरा होऊन योगी बनतो. मुलाकडे राज्य सोपवून मार्गस्थ होतो. यासाठीच आपल्या आतील प्रभूंना जागृत करा.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# गेल्या पंधरा दिवसांपासून पोखर्डीतील 'बंद' असलेला पाणीपुरवठा सुरू करावा अन्यथा आंदोलनाचा इशारा

**पालकमंत्र्यांकडे मागणी**

नगर – नगर तालुक्यातील पोखर्डीतील श्रीरामनगर वस्ती व परिसरात बुऱ्हाणनगर पाणी योजनेतून पाणीपुरवठा होत असून गेल्या पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा बंद झाल्याने स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत लक्ष घालून तातडीने शासकीय टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा व पाणी प्रश्न सोडवावा, अशी मागणी जनसेवा ड्रायव्हर पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष गोरक्षनाथ कराळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



गोरक्षनाथ कराळे

निवेदनात त्यांनी म्हटले की गेल्या अनेक महिन्यांपासून बुऱ्हाणनगर पाणी योजनेतून अत्यंत अनियमित पाणीपुरवठा होत आहे. पोखर्डी गावाला बऱ्याच महिन्यांपासून १५ दिवसातून एकदाच पाणी येते. सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थितीमुळे ही बाब असेल तर ४ दिवसांमधून १ वेळा शासकीय टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा. १५ दिवसातून एकदाच पाणी न सोडता किमान ४ दिवसाला पाणी सोडावे. पिण्याचे पाणीटंचाईने नागरिक हैराण झाले आहेत. तरी १० दिवसात शासकीय टँकरने किंवा योजनेतून सुरळीत पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा द्यावा. दहा दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास जनसेवा ड्रायव्हर पार्टी व पोखर्डी ग्रामस्थांच्या वतीने शेंडी बायपास चौकात रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा गोरक्षनाथ कराळे यांनी दिला आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना भेटून वस्तुस्थिती सांगितली, तसेच सर्व विभागांना ई-मेल आयडीवर माहिती दिली, आपले सरकार पोर्टलवर तक्रार करून सुद्धा कुठलाही ठोस निर्णय घेतला जात नाही, कुठलीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे ना.विखे पाटील यांनी लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा अशी अपेक्षा कराळे यांनी व्यक्त केली.

# कामाचे पैसे मागितल्याच्या रागातून मजुराला मारहाण

नगर – अहिल्यानगर शहरातील दिल्लीगेट परिसरात मजुरीचे पैसे मागितल्याच्या वादातून नगरसेवक श्रीपाद छिंदमने मजुराला शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संजय सखाराम निंबाळकर (वय ५७ , धंदा-मजुरी, रा. दिल्लीगेट, ता. जि. अहिल्यानगर) हे दिल्लीगेट परिसरात मजुरीचे काम करतात. २१ ऑक्टोबर २०२६ सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास संजय निंबाळकर यांनी नगरसेवक श्रीपाद छिंदम (रा. दिल्लीगेट, अहिल्यानगर) याच्याकडे आपल्या कामाचे पैसे मागितले. कामाचे पैसे मागितल्याचा राग आल्याने श्रीपाद छिंदम याने संजय निंबाळकर यांना शिवीगाळ केली. तसेच तेथे इमारतीचे काम सुरू असल्याने जवळील लाकडी दांडा उचलून संजय यांच्या डाव्या हातावर मारहाण केली आणि लाथाबुक्क्यांनी सुद्धा मारहाण केली. तू माणसात मला पैसे मागितलेस, तुला पैसे मी देणार नाही, असे म्हणून आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली आणि तिथून निघून गेला. या प्रकरणी संजय निंबाळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगरसेवक श्रीपाद छिंदम विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ११५ (२), ३५२ आणि ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रेशन दुकानात सडलेले धान्य वाटप

## ऐन सणासुदीच्या काळात गरीबांच्या तोंडचा घास हिरावला, प्रशासन गप्प

नगर – रेशन दुकानांमध्ये सध्या अत्यंत निकृष्ट दर्जाचा, जाळ्यायुक्त तांदूळ आणि सोंडे लागून कुबट वास येत असलेला गहू वाटप केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ऐन दसरा-दिवाळीच्या सणासुदीच्या काळात सरकार गरिबांची थट्टा करत आहे का? असा संतप्त सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेना पारनेर तालुका अध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांनी उपस्थित केला आहे.



पारनेर तालुक्यातील रेशन दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे व सडलेले धान्य वाटप केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत पुरवठा अधिकारी यांच्यासोबत फोनद्वारे चर्चा करून त्यांना जाब विचारला असता त्यांनी स्वस्त धान्य दुकानदारांकडून याची माहिती मागवूनही ही माहिती संबंधीतांकडून कळविली गेली नाही. लगेच चौकशी करून धान्य वाटप थांबवण्यात येईल अशी ग्वाही पुरवठा अधिकाऱ्यांनी दिली आहे. परंतु त्यामुळे हे स्पष्ट होते आहे की पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार यांच्या हलगर्जीपणामुळे गरिबांच्या अन्न सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मोफत धान्याच्या नावाने सडलेले धान्य देणे हे महाराष्ट्र नवनिर्माण सेना कदापि सहन करणार नाही. दोन दिवसांत संबंधित धान्य बदलून न दिल्यास मनसे स्टाईलने तहसीलदार आणि पुरवठा अधिकारी यांना जाब विचारला जाईल, असा इशारा मनसे तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# सन फार्मा विद्यालयात अंधश्रद्धेविरोधात विज्ञानवादी विचारांचा जागर



नगर– बालवयात अंधश्रद्धा बाजूला सारून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या उद्देशाने सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) वतीने विज्ञान जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अंनिसच्या वतीने विविध वैज्ञानिक प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचा आणि त्यांच्या मनातील जिज्ञासा वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अहिल्यानगरचे प्रधान सचिव टी. के. जगधने यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्त्व आणि अंधश्रद्धेचे दुष्परिणाम यांवर प्रकाश टाकला. प्रत्येक गोष्टीमागील कार्यकारणभाव शोधणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब सातपुते, विनायक सापा, टी. के. जगधने आणि आरएसपी अधिकारी राजेंद्र धस यांनी कै. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांनी अनेक चमत्कार वाटणाऱ्या प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करून त्यामागील वैज्ञानिक सत्य विद्यार्थ्यांसमोर उलगडले. तथाकथित चमत्कार किंवा बुवाबाजीमध्ये हातचलाखीने वापरल्या जाणाऱ्या क्लृप्त्या कशा प्रकारे विज्ञानाच्या आधारे सादर केल्या जातात, हे त्यांनी विविध प्रयोगांद्वारे दाखवून दिले. या सादरीकरणानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य सातपुते, ससे, बारस्कर, श्रीमती महांडुळे, भोगे मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष संपतराव बारस्कर यांनी अंनिसच्या या उपक्रमाचे कौतुक केले. अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या आणि बुवाबाजी करणाऱ्या भोंदू व्यक्तींपासून समाजाचे संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः जागरूक होऊन पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

# नवीन रेल्वे मालधक्क्यावरील काम दीड महिन्यानंतर पुन्हा सुरू

## हमालांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न सोडवा; यापुढील निर्णय चर्चेतूनच घेणार : अविनाश घुले



नगर – नवीन रेल्वे मालधक्क्यावरील मागील दीड महिन्यांपासून बंद असलेले काम जिल्हा हमालपंचायत, सहाय्यक कामगार आयुक्त आणि हुंडेकरी यांच्यात झालेल्या चर्चेनंतर पुन्हा सुरू झाले. बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा करून परस्पर सहमतीने तोडगा काढण्यात आला. यावेळी उपस्थितांच्या हस्ते रेल्वेने माल घेऊन आलेल्या गाडीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर माल उतरविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या निर्णयामुळे हमाल-माथाडी कामगार, मुकादम आणि हुंडेकरी यांच्यासह मालधक्क्याशी संबंधित घटकांना दिलासा मिळाला आहे. जिल्हा हमालपंचायतीच्या माध्यमातून सर्व संबंधितांना एकत्र आणून हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मागील दीड महिन्यांपासून काम बंद असल्यामुळे कामगारांच्या रोजगारावर परिणाम झाला होता, तसेच मालधक्क्याशी संबंधित व्यावसायिकांचेही नुकसान होत होते. त्यामुळे कामकाज पुन्हा सुरू करण्यासाठी सर्वांनी चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढण्याची भूमिका घेतली. सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत कामगारांच्या अडचणी, माल उतरविल्यानंतरची जबाबदारी, कामाचा हिशेब आणि परस्परांमधील कराराच्या अटी यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यानंतर काम पुन्हा सुरू करण्याबाबत सहमती झाल्याने मालधक्क्यावरील कामकाज पूर्ववत झाले.

जिल्हा हमालपंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी यावेळी कामगारांच्या प्रश्नांबाबत भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, गेल्या दीड महिन्यांपासून काम बंद असल्यामुळे सर्वांचेच अतोनात नुकसान झाले आहे. हमाल-माथाडी कामगार, मुकादम, हुंडेकरी आणि मालधक्क्याशी संबंधित व्यावसायिक हे एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यामुळे कोणत्याही एका घटकाचा विचार करून निर्णय घेण्याऐवजी सर्वांच्या हिताचा विचार केला पाहिजे. यापुढे कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास मुकादम आणि संघटनेच्या प्रतिनिधींनी एकत्र बसून चर्चा करावी आणि त्यातून मार्ग काढावा. परस्परांमध्ये समन्वय राहिल्यास कामकाज बंद ठेवण्याची वेळ येणार नाही. नवीन रेल्वे मालधक्क्यावर काम करणाऱ्या हमाल-माथाडी कामगारांना आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मालधक्क्यावर कामगारांसाठी छताची व्यवस्था, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा आणि स्वच्छ शौचालय उपलब्ध करून देण्यात यावे. कामगारांना कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा मिळाल्यास त्यांना चांगल्या वातावरणात काम करता येईल. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा. 'मालक जगले तर आम्ही जगणार, ही रथाची दोन चाके आहेत,' असे सांगत घुले यांनी कामगार आणि व्यावसायिकांचे हित एकमेकांशी जोडलेले असल्याचे स्पष्ट केले. तसेच या येथे काम करणारे २० मुकादमाच्या टोळी पैकी १८ टोळींनी हमाल पंचायत चे नेतृत्व मान्य केले आहे सुमारे ५५० कामगार हे अविनाश घुले यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे तसेच कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता सर्वांनी एकमेकांना सहकार्य करावे आणि भविष्यातील प्रश्न चर्चेतूनच सोडवावेत, असे आवाहनही घुले त्यांनी केले.

सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले यांनीही कामगारांच्या मागण्यांबाबत रेल्वे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. रेल्वे प्रशासनाने हमाल-माथाडी कामगारांच्या मागण्यांचा लवकरात लवकर विचार करून त्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. कामगारांना कामाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक असून, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधित प्रशासनाने पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले. बैठकीत माल उतरविल्यानंतर मालाच्या जबाबदारीबाबतही चर्चा करण्यात आली. ठरलेल्या अटींनुसार माल उतरविल्यानंतर त्याची जबाबदारी कामगारांवर राहणार नसल्याचा मुद्दा मांडण्यात आला. माल चोरीला जाणे, गहाळ होणे किंवा मालाच्या प्रमाणात तफावत आढळणे अशा बाबींमध्ये जबाबदारी निश्चित करताना स्पष्टता असावी, यावर भर देण्यात आला. तसेच मुकादमांनी कामाचा हिशेब व्यवस्थित ठेवावा आणि कामकाजात पारदर्शकता राखावी, असेही ठरविण्यात आले. मालधक्क्यावरील कामकाजात गैरसमज निर्माण होऊ नयेत आणि माल उतरविल्यानंतर जबाबदारीवरून वाद उद्भवू नयेत, यासाठी सर्व संबंधितांनी ठरलेल्या अटींचे पालन करावे, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली.

बैठकीत आगरकर मळा, अहिल्यानगर येथील हुंडेकरी आणि माथाडी मुकादम यांच्यात झालेल्या मंजुरी करारासंदर्भातील मुद्द्यावरही चर्चा झाली. संबंधित कराराच्या अटी आणि लागू कालावधी याबाबत चर्चा करून ठरलेल्या तरतुदींनुसार कामकाज करण्यावर भर देण्यात आला. बैठकीत दोन्ही बाजूंमध्ये योग्य तो समझोता झाल्याने परस्परांमध्ये तक्रारी राहणार नसल्याचे नमूद करण्यात आले. यापुढे कामकाज करताना परस्परांमध्ये समन्वय राखणे आणि कोणताही वाद निर्माण झाल्यास तो चर्चेतून सोडविणे, यावर सहमती झाली. जिल्हा हमालपंचायतीच्या माध्यमातून सर्व संबंधित घटकांना एकत्र आणून प्रश्न सोडविण्यात आल्याने काम पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला. काम बंद असल्यामुळे रोजगार आणि आर्थिक व्यवहारांवर परिणाम झाला होता. आता कामकाज पुन्हा सुरू झाल्याने संबंधितांना दिलासा मिळाला आहे. मात्र, कामगारांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा असून, त्याबाबत रेल्वे प्रशासनाने लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कामगारांच्या हिताचे रक्षण करतानाच मालधक्क्यावरील कामकाज नियमित सुरू राहावे, यासाठी सर्व घटकांनी सहकार्य करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी करीमभाई हुंडेकरी आणि रमाकांत गाडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक सुरेश निर्भवणे यांनी केले. मागील दीड महिन्यांपासून काम बंद असल्याने सर्व संबंधितांना अडचणींचा सामना करावा लागत होता. जिल्हा हमालपंचायतीच्या माध्यमातून सर्वजण एकत्र आले आणि चर्चेतून या प्रश्नावर तोडगा काढण्यात आला. त्यामुळे आजपासून कामकाज सुरळीतपणे सुरू झाले असल्याचे त्यांनी सांगितले. कामकाज सुरळीत सुरू राहण्यासाठी सर्वांनी एकमेकांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि परस्पर सहकार्याची भूमिका ठेवावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

बैठकीनंतर उपस्थितांच्या हस्ते माल घेऊन आलेल्या रेल्वे गाडीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर माल उतरविण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली. यावेळी जिल्हा हमालपंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले, सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले, गोविंद सांगळे, हुंडेकरीचे करीमभाई हुंडेकरी, रमाकांत गाडे, भरत ठाणगे, प्रशांत गायकवाड, मधुकर केकान, वाहिद, रेल्वे प्रशासनाचे महाजन, थोरात, शेख रज्जाक, संजय महापुरे, सतीश शेळके, रवींद्र भोसले, सुरेश निर्भवणे, भैरू कोतकर यांच्यासह हमाल-माथाडी कामगार उपस्थित होते. चर्चेतून प्रश्न सोडवून काम पुन्हा सुरू झाल्याने सध्या निर्माण झालेला पेच मिटला असला, तरी कामगारांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी कायम आहे. रेल्वे प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा कामगारांकडून व्यक्त होत आहे.

